


# संपादकीय

## एक विलक्षण नाते- लेखकाचे आणि वाचकाचे!

''मला लता मंगेशकरांनी म्हटलेली गाणी आवडतात. त्यांच्या नव्या रेकॉर्डस आणि टेप्स मी माझ्या संग्रहात ठेवतो.''

''मला माधुरी दीक्षित आवडते. तिने काम केलेला एकही चित्रपट मी चुकवत नाही. शक्यतो प्रिमियर शो मी बघतो- मग त्यासाठी तिकिटाला कितीही रक्कम मोजावी लागली तरी मी मागेपुढे बघत नाही.''

''मी पं. भीमसेन यांचा चहाता आहे. त्यांचा एकही कार्यक्रम चुकवत नाही. आता त्यांचे कार्यक्रम कमी होतात; परंतु त्यांच्या सर्व ध्वनिमुद्रिका माझ्याजवळ आहेत.''

''बाबा, लवकर घरी चला ना! मला शक्तिमानचा एपिसोड बघायचा आहे. तो त्या ब्लॅक कॅटचा कसा काटा काढतो- ते आज दाखवणार आहेत.''

-अशी वाक्ये कानावर पडतात तेव्हा त्यातून काय सूचित होते? त्यातून सूचित होते ते कलावंत आणि रसिक यांच्यातील अतूट जिव्हाळ्याचे आणि आत्मीयतेचे नाते! आपल्या आवडत्या कलावंतासाठी रसिक वाटेल ते करायला तयार असतात. त्यांच्या कलाकृतीवर कार्यक्रमावर, कॅसेटवर, चित्रप्रदर्शनावर, नाटकावर ते अक्षरश: तुटून पडतात. त्यासाठी खर्चाची तमा बाळगत नाहीत.

एखादा लेखक, कवी, एखादा संपादक, एखादे वृत्तपत्र वा नियतकालिक, यांच्याबाबतही असेच वाचकाचे प्रेमाचे नाते जडते, आणि त्या लेखककवीचे प्रत्येक पुस्तक वाचण्याची उत्सुकता लागून राहते. त्याच्या नव्या पुस्तकाची लोक आतुरतेने वाट पाहतात. नियतकालिकाच्या ताज्या अंकाची वाचक उत्सुकतेने प्रतीक्षा करतात. त्या नवीन अंकात काय साहित्य आहे याबद्दल जिज्ञासा दाखवतात. लेखक व वाचक यांचे हे नाते, संपादक व वाचक यांचे हे नाते हे एक विलक्षण नाते असते आणि ते एकमेकांच्या आशाआकांक्षांच्या आणि विश्वासाच्या पायावर उभे असते. एखाद्या लेखकाने रंगवलेल्या जीवनाशी कुठेतरी आपले भावबंध जुळतात, त्या लेखकाने मांडलेल्या जीवनदृष्टीतून किंवा वैचारिक भूमिकेतून आपल्याला नवे काही जाणवल्याचा आनंद लाभतो; आपलेच विचार किंवा आपल्याच मनातली वेदना हा माणूस अत्यंत चपखलपणे व्यक्त करतो आहे या भावनेनेही आपल्यातील



समानधर्मीयांचे नाते दृढ होत जाते. आपल्याला अगदी अनोळखी वा अज्ञात असणाऱ्या विश्वात हा लेखक आपल्याला घेऊन जातो आणि या विश्वाचे गूढ उकलून दाखवण्याचा प्रयत्न करतो याबद्दलही आपल्याला कधी कधी अप्रूप वाटते. कधी त्याने दाखवलेले भाषेचे लालित्य आपल्याला चकित करते; कधी आपल्या नात्यांमधील त्याने दाखवलेले नाट्य भारावून टाकते.

वाचक आणि लेखक यांचे हे नाते म्हणजे एक खास नाते असते. ते फक्त एकाचे दुसऱ्याशी असे दोघांमधले असते. आपला आवडता लेखक ही खास आपली एकट्याची प्रियतम ठेव आहे असे वाचकाला वाटते आणि माझा हा वाचक म्हणजे माझा सर्वात जवळचा मित्र-सखा-भक्त अशी भावना लेखकाची असते. मी लिहितो ते याच्यासाठी, याने वाचले की माझ्या लेखनाचे सार्थक झाले; मला सारे काही भरून पावले अशी जाणकार चाहत्या रसिकाबद्दलची भावना लेखकाची, कलावंताची असते. भाऊसाहेब खांडेकर, ना.सी.फडके, राम गणेश गडकरी, रणजित देसाई, जी. ए. कुलकर्णी अशा काही लेखकांना त्यांच्या काळात त्यांच्या विशिष्ट वाचकांच्या अलोट प्रेमाचा लाभ मिळाला. आजही पु.ल.देशपांडे, कुसुमाग्रज, वसंत कानेटकर, व.पु.काळे, विंदा करंदीकर, ग्रेस अशा काही लेखकांभोवती अशा निष्ठावंत वाचकांचे कमी जास्त वलय झळाळताना दिसते. ही नावे केवळ प्रातिनिधिक म्हणून येथे घेतली आहेत; परंतु असे अनेक लेखक कवी आहेत; आणि खास त्यांच्यावर प्रेम करणारा त्यांचा वाचकवर्ग आहे. बाबा कदम यांची पुस्तके आवडीने वाचणारा वर्ग- त्यांच्या लेखी बाबा कदम हेच दैवत असते. शिवाजी सावंतांच्या मृत्युंजयवर फिदा असलेला वाचक मूळ महाभारतापेक्षाही सावंतांच्या कर्णातच संपूर्ण सत्याचा प्रत्यय आल्याच्या आनंदात मशगुल राहतो. सुरेश भटांच्या गझलांवर खूष असलेला वाचक त्यांची सतत बदलणारी पैगंबरविषयक किंवा शिवसेनाविषयक मते सहजपणे नजरेआड करून त्यांच्या शेरोशायरीला दाद देतो... हे असे आपल्या वाचकांशी जिव्हाळ्याचे नाते जोडणारे जे लेखक असतात त्यांना एका प्रकारे धन्यतेचा अनुभव येतो. वाचकांच्या उत्कट लोभामुळे त्यांची कलाही फुलून येते; त्यांच्या लेखनाला बळ लाभते. त्यांच्या लेखणीला धार चढते. त्यांच्या जीवनाच्या आणि आकलनाच्या कक्षा रुंदावतात; त्यांच्या शब्दांना तेज लाभते. ज्ञानदेवांप्रमाणे 'सुखिया झाला'चा विश्वात्मक प्रत्यय त्यांना येऊ लागतो. आपल्या लेखणीतून जे काही अशा मनाच्या उन्नत अवस्थेत उतरते ते पाहून ते स्वत:ही कधी कधी थक्क होतात. हे मी नाही लिहिले, माझ्याकडून कोणीतरी लिहून घेतले, असेही मग त्यांना वाटत राहते. ''आपुलिया बळें नाही मी बोलत'' अशी कबुली देतानाही मग त्यांना संकोच वाटत नाही. ''फोडिले भांडार

धन्याचा हा माल मी तो हमाल भारवाही" अशी मग नम्रतेची, आत्मविलोपाची भाषाही सहजगत्या ते बोलतात. त्यात त्यांना कसला संकोच वा कमीपणा वाटत नाही. आणि वाचकही त्यामुळे विचलित होत नाहीत.


लेखक-वाचकामधला हा अभंग विश्वास ही म्हणूनच अत्यंत पवित्र गोष्ट आहे; आणि या दोघांनीही या विश्वासाला तडा न जाईल अशी आपापल्या परीने काळजी घेतली पाहिजे.

याचा अर्थ आपल्या आवडत्या लेखकाचे सुमार लेखनही वाचकाने चांगले मानावे असे नाही; किंवा सर्वांनाच सर्वच लेखकांचे सर्वच लेखन आवडायला हवे असे नाही. आपल्याला जे आवडते त्याच्यावर आपण प्रेम करावे. इतरांची पर्वा करू नये. लेखकाने आपला वाचकवर्ग निर्माण करावा आणि त्याला आपल्या प्रतिभेच्या बळावर सतत सांभाळून ठेवावे. ते नाते दृढ करावे. लेखनाचे प्रयोग करावे; वाचकाला नवनवीन पैलू दाखवावे पण त्याचा अपेक्षाभंग करील असा सूर लावून त्याला निराश करून दूर लोटू नये.

एकदा आपला म्हटले की मग एकमेकांचे दोष काढत बसण्याची गुस्ताखी करायची गरज उरत नाही. आपल्या आवडत्या लेखकाचे लेखन वाचकांनी आवडीने वाचावे; लेखकांनीही या वाचकाला सुखवत राहावे.

आपला आवडता लेखक हा सर्वच बाबतीत श्रेष्ठ आणि सर्वगुणसंपन्न आहे असे मानण्याची गरज नाही; आणि लेखकांनीही तशा भ्रमात राहू नये. परंतु आपले साहित्य आवडीने वाचणारा कोणीतरी रसिक वाचक आहे याची जाणीव ठेवून आपली सर्व ताकद पणाला लावून, सतत चांगल्या कृती त्याला देत राहून त्याचा विश्वास सांभाळत राहावे. वाचक-लेखकाचे हे भावबंधाचे नाते जपावे.


लैला मजनू हे आदर्श प्रेमाचे प्रतीक आपण मानतो. एकाने मजनूला म्हटले, "अरे, ही लैला तर रंगाने काळीसावळी आहे. आणि तरी तू तिला सुंदर मानून तिच्यासाठी पागल होतोस-" तेव्हा मजनूने उत्तर दिले, "त्यासाठी तुला माझ्या नजरेने बघावे लागेल." तसे हे आपल्या लेखक-वाचक प्रेमाचे गुपित आहे. आपला आवडता लेखक इतर काहीजणांना तेवढासा महत्त्वाचा वाटणार नाही; आपल्याला तो आवडतो ना! मग झाले. हा प्रेमाचा मामला आहे. त्याला रुक्ष समीक्षेचे निकष लावणे खुळेपणाचे आहे.





# कविवर्य कुसुमाग्रज

कविवर्य कुसुमाग्रज यांचे नाशिक येथे दि. १० मार्च १९९९ रोजी दुपारी १२ वाजता देहावसान झाले. दि. ११ रोजी शासकीय इतमामाने २१ बंदुकीच्या सलामीसह त्यांजवर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्या वेळी लक्षावधी नाशिककर व कुसुमाग्रजांचे चहाते उपस्थित होते.



विष्णू वामन शिरवाडकर यांचे मूळ नाव गजानन रंगनाथ शिरवाडकर असे होते. दत्तक गेल्यानंतर त्यांचे नाव विष्णू वामन शिरवाडकर असे झाले. आप्तस्वकियांसह साहित्य व सांस्कृतिक मित्रपरिवारात 'तात्यासाहेब' या आदरार्थी आणि आपुलकीच्या नावाने त्यांना संबोधले जाई. कुसुमाग्रज यांचा जन्म २७ फेब्रुवारी १९१२ रोजी पुण्यात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण पिंपळगाव येथे, तर माध्यमिक शिक्षण नाशिकच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये पार पडले. न्यू इंग्लिश स्कूल म्हणजेच आताचे रुंगटा हायस्कूल. शालांत परीक्षा ते मुंबई विद्यापीठातून उत्तीर्ण झाले.

अवघ्या १७ वर्षांचे वय असताना तात्यासाहेबांची काव्यप्रतिभा चमकू लागली. १९२९ साली तत्कालीन प्रख्यात कवी देवदत्त नारायण टिळक यांच्या संपादनाखाली निघणाऱ्या 'बालबोधमेवा' या बालमासिकात तात्यासाहेबांच्या कवितांसह लेखही प्रसिद्ध होऊ लागले. १९३० च्या सुमारास त्यांनी हं. प्रा. ठा. महाविद्यालयात प्रवेश घेतला. 'रत्नाकर' या मासिकात त्यावेळी त्यांच्या कविता प्रसिद्ध होऊ लागल्या होत्या. १९३२ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली नाशिकच्या श्री काळाराम मंदिराबाहेर झालेल्या सत्याग्रहात तात्यासाहेबांनी भाग घेतला आणि त्यानंतर त्यांचे लिखाण केवळ कवितांपुरतेच मर्यादित न राहाता लेख, कथा, कादंबरी, नाटक या स्वरूपातही प्रसिद्धीस पावले. साप्ताहिक 'प्रभा', दैनिक 'प्रभात', सारथी, धनुर्धारी, नवयुग यांसारख्या तत्कालिन पत्रांमध्ये त्यांनी लिखाण केले.

१९४२ साली कुसुमाग्रज यांचा 'विशाखा' नामक पहिला काव्यसंग्रह प्रकाशित झाला. मराठी साहित्यविश्वात या काव्यसंग्रहाने मानाचे स्थान मिळविले. कवितेवर प्रेम करणारा प्रत्येक मराठी माणूस 'विशाखा'चा नामोल्लेख आजही आवर्जून करतो.

त्यांच्या 'नटसम्राट' या नाट्यसंहितेस तर नाट्यरसिकांबरोबरच साहित्यप्रेमींनीही डोक्यावर घेतले. मराठी नाट्यविश्वात हे नाटक 'मैलाचा दगड' म्हणून मानले जाते.

## पुरस्कार

वि. वा. शिरवाडकर यांना मिळालेल्या मान-सन्मान, पुरस्कारांची संख्या मोठी आहे. त्यापैकी काही प्रमुख सन्मान-पुरस्कारांचा उल्लेख खालीलप्रमाणे करता येऊ शकेल.

१९७४ साली 'नटसम्राट' नाट्यसंहितेसाठी साहित्य अकादमी पुरस्कार.

१९८५ साली अखिल भारतीय नाट्यपरिषदेचा राम गणेश गडकरी पुरस्कार.

१९८६ साली पुणे विद्यापीठाची डी. लिट. पदवीने सन्मानीत.

१९८८ साली संगीत नाट्यलेखन पुरस्कार.

या सर्व पुरस्कारांवर कळस चढवला तो 'ज्ञानपीठ' या राष्ट्रीय पातळीवरील सर्वोच्च पुरस्काराने! मराठी साहित्याला त्यांच्या प्रतिभासंपन्न लेखणीने जी समृद्धी आणि श्रीमंती दिली त्याबद्दल हा गौरव करण्यात आला. त्यांचे गुरू आणि मार्गदर्शक विख्यात साहित्यिक वि. स. खांडेकर यांना यापूर्वी हा पुरस्कार 'ययाती' या कादंबरीसाठी मिळाला होता. 'ज्ञानपीठ' पुरस्कार मिळविणारे शिरवाडकर हे दुसरे मराठी साहित्यिक ठरले.

## सार्वजनिक जीवन

साहित्यिविश्वात ~~'कुसुमाग्रज' आणि 'वि. वा. शिरवाडकर' या नावांनी आपला~~ आदरयुक्त दबदबा निर्माण केला. नाशिककरांसाठी मात्र ते अखेरपर्यंत 'तात्यासाहेब'च राहिले.

निसर्गरम्य, सुशांत गावाकाठी सदैव झुळझुळणारा नितळ पाण्याचा झरा जसा मनामनाला 'आपलासा' करून टाकतो, तद्वतच तात्यासाहेबांचे व्यक्तिमत्त्व होते.

नाशिकच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनात तात्यासाहेबांनी 'प्राण' फुंकला! महाराष्ट्रात पुण्यनगरी नाशिकला 'सांस्कृतिक' राजधानी इतपत ओळख देण्याकामी त्यांची कृतिशील प्रेरणा कारणीभूत ठरली. तात्यासाहेबांच्या निधनाने नाशिकच्या सांस्कृतिक जीवनातील सूर्य मावळला आहे; परंतु सूर्य असा आहे, की त्याच्या प्रकाशाचा करिष्मा अंधारालाही प्रकाशी जीवन देईल!

नाशिकच्या कला-सांस्कृतिक सामाजिक जीवनाचे अधिष्ठान बनलेल्या 'सार्वजनिक वाचनालय' या १५० हून अधिक वर्षे वयोमान असलेल्या संस्थेच्या अध्यक्षपदाची धुरा तात्यासाहेबांनी १९६२ साली अंगावर घेतली आणि पुढील दहा वर्षांत नाशिकचे सार्वजनिक जीवन आमूलाग्र पालटले. १९६२ ते १९७२ हा कालावधी खरोखरच नाशिकच्या सार्वजनिक वाचनालयासाठी जणू सुवर्णयुग ठरला. अनेक लोकोपयोगी तसेच सांस्कृतिक व कलाक्रीडादी संस्थांचा जन्म तात्यासाहेबांच्या प्रेरणेने या काळात झाला. सार्वजनिक वाचनालयात प्रवेश करणारा रसिक नाशिककर अन् तात्यासाहेब यांचे भावबंध अतूट होते. कोणत्याही व्यक्तीला मार्गदर्शन करण्याला तात्यासाहेबांनी कधी नकार दिला नाही. प्रत्येकाचं गाऱ्हाणं त्यांनी ऐकलं. शक्य तेवढं निवारलं. नवा हुरूप दिला, नवा आविष्कार



घडवला, नवा साक्षात्कार दिला! सामाजिक कार्यासाठी पुढे येणाऱ्या प्रत्येकाला त्यांनी मदतीचा हात दिला अन् पुढील काळात त्यांचाच आदर्श नाशिककरांनी एकमेकांसाठी गिरवला यात शंका नाही. नव्या दमाच्या लेखक - कवी मंडळींचा तर त्यांनी यत्किंचितही कधी हिरमोड होऊ दिला नाही. प्रत्येकाचा वकूब ओळखून सुयोग्य मार्गदर्शन वा दिशा देण्याचे काम त्यांनी अव्याहत केले!

सभा-समारंभ-सत्कार वगैरे प्रकार म्हटला की, तात्यासाहेबांचा त्यासाठी स्पष्ट आणि स्वच्छ नकार असायचा. मिरवणे हा प्रकार त्यांच्या वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनात कधीही, केव्हाही नव्हता. सभासमारंभात आलेच तर मागचे किंवा कोपऱ्यातील एखादे आसन ते अलगद पकडायचे. त्यांच्या येण्याची चाहूल कोणाला तरीच काय दस्तुरखुद्द वक्त्यालाही तत्क्षणी लागायची अन् अखेर आदरभावाने नामोल्लेख एकदा तरी व्हायचाच!

मराठी राम गणेश गडकरी व इंग्रजीत पी.जी. वुडहाऊस हे तात्यासाहेबांचे आवडते लेखक, तर कलावंतांमध्ये चार्ली चॅप्लिन!

## गोरगरिबांचा कैवारी

गोरगरीब, रंजल्या - गांजल्या लोकांसाठी तात्यासाहेबांच्या हृदयात अपार करुणा होती. गरजूंना सदैव भरल्या मदतीचा हात पुढे असायचा. आदिवासींसाठी तर त्यांनी विशेष म्हणावे असे कार्य वाचना~~लय आदी संस्था व उपक्रमांद्वारे केले. समाजात ज्यांच्याकडे~~ समृद्धी, संपत्ती व दानशूरता आहे, त्यांच्याकडून ती ज्यांच्याकडे नाही त्याच्याकडे प्रवाहित करण्याकडे तात्यासाहेबांचा खास प्रयत्न असायचा. त्यांच्या या आंतरिक तळमळीतूनच पुढे कुसुमाग्रज प्रतिष्ठान जन्माला आले. या प्रतिष्ठानसाठी त्यांनी स्वत: एक लाख रुपयांची देणगी दिली. आजमितीला या प्रतिष्ठानद्वारे नानाविध उपक्रम राबविले जातात.

आदिवासी जनतेसाठी त्यांनी सुरू केलली चळवळही अशीच फोफावली असून, स्वयंसेवकांची पलटणच प्रत्येक ठिकाणी स्वयंस्फूर्तीने हे काम बघत आहे. त्यामध्ये प्रौढ शिक्षणाचे वर्ग चालविणे, प्रथमोपचाराच्या सोयीसुविधा उपलब्ध करून देत प्रशिक्षण देणे, सांस्कृतिक व कला क्रीडादी उपक्रमांचा समावेश आहे. नाशिक शहरालगतच्याच सात गावांमध्ये अशा तऱ्हेचे उपक्रम अव्याहत राबविले जात आहेत. या गावांमध्ये 'कुसुमाग्रज वाचनालय' उघडून त्याद्वारे साक्षरता व वाचनाची आवड निर्माण केली जात आहे.

ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्यानंतर कुसुमाग्रज आनंदित झाले; परंतु केवळ आपल्या आनंदावर समाधान मानणाऱ्यांपैकी ते नव्हते. आपल्या सहकारी लेखकमित्रांसाठी असाच काहीसा प्रेरणादायी पुरस्कार असावा या विचारातून त्यांनी कुसुमाग्रज प्रतिष्ठानद्वारे जनस्थान पुरस्कार सुरू केला. १९९१ साली पहिला जनस्थान पुरस्कार विजय तेंडुलकर यांना, १९९३ साली दुसरा पुरस्कार कविवर्य विंदा. करंदीकर यांना आणि १९९५ साली कवयित्री इंदिरा

संत यांना हा पुरस्कार मिळाला. १९९७ साली गंगाधर गाडगीळ यांनी हा मान मिळविला. केवळ साहित्यविश्वापुरतीच नव्हे, तर चित्रकला, शिल्पकला, संगीत, नृत्य, सामाजिक कार्य, नाटक, सिनेमा, क्रीडा व साहस, आदी प्रकारांकडेही कुसुमाग्रजांनी आयुष्यभर रसिक वृत्तीने बघितले. त्या क्षेत्रातील कलावंतांनाही सन्मानाची पावती वा प्रेरणा मिळावी म्हणून गोदावरी पुरस्कार देण्याची संकल्पना साकार झाली. १९९२ सालापासून पाच क्षेत्रांतील दिग्गजांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते.

नाशिक शहर तात्यासाहेबांना ऋषितुल्य नव्हे साक्षात 'ऋषी' मानत आले आहे आणि मानत राहणार. त्यांची उत्तुंग प्रतिभा, त्यांचे अवकाशसमान ज्ञान, त्यांच्या हृदयी वसणारे असीम कारुण्य, माणुसकीचा खळाळता झरा त्यांच्यासमवेत चार-दोन क्षण घालविलेल्या प्रत्येकाला त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील प्रसन्नतेची माधुकरी मिळत असे. त्यामुळेच पुण्यनगरी नाशिक म्हटली की प्रथम राम आणि त्यानंतर 'कुसुमाग्रज' आठवणार यात शंकाच नाही!

## संध्या

*उषा सुंदर होतीच*
*पण अधिक सुंदर आहे*
*ही संध्या.*
*हा सूर्य*
*मावळतीवर उतरलेला*
*दिवसभरच्या प्रकाशदानाने*
*कृतार्थ झालेला*
*अधिक स्नेहशील, अधिक प्रकाशमय.*
*निर्वाहासाठी*
*आकाशात प्रवेशणाऱ्या*
*क्षुधित पाखरांपेक्षा*
*तृप्त संतोषाने, जंगलाकडे*
*परतणारी ही पाखरं*
*अधिक आनंदमय.*
*आणि मी माझे अस्तित्व*
*प्रकाशात प्रवेश करताना*
*पूर्ण निराशय असलेले*
*आता अंधारात विश्रांत होताना*
*सर्वंकष आशयाने*
*शिगोशिग भरलेले*
*असण्याचे उन्नयन*
*जगण्यात करणारी*
*ही संध्या.*

**('करार एका ताऱ्याशी' : कुसुमाग्रज या पुस्तकातून)**
**प्रकाशक : मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**






"या पुस्तकात भारत सरकारचे राष्ट्रीय युवकधोरण, राष्ट्रीय सेवायोजनेची उद्दिष्ट्ये, इतिहास, कार्याची व्याप्ती, तिची प्रशासकीय व्यवस्था, तिचा आर्थिक आकृतिबंध, योजनांतर्गत घेतली जाणारी श्रमसंस्कार शिबिरे, दत्तक खेडे योजना, दत्तक झोपडपट्टी यांचा विस्तृत परिचय करून दिला आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेशी संबंधित प्राचार्य, प्राध्यापक, प्रशिक्षक, शैक्षणिक क्षेत्रातील प्रशासक, विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि पालकवर्ग तसेच स्वयंसेवी संघटना या सर्वांनाच हे पुस्तक उपयुक्त वाटेल."

**डॉ. दत्तात्रय नारायण धनागरे**
कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**राष्ट्रीय सेवा योजना NSS वरील मराठीतील पहिले दर्जेदार पुस्तक**

# राष्ट्रीय सेवा योजना

*(तत्त्व, व्यवहार आणि उपयोजन)*

*लेखक*
प्राचार्य पुरुषोत्तम शेठ, प्रा. डॉ. जयश्री खांबेटे, प्रा. सौ. शैलजा माने

**पृष्ठे २०८ किंमत १४० रुपये**

प्राप्तीस्थान :
**ग्रंथविशेष प्रतिष्ठान**, २० विशालश्री सोसायटी, ४५९ नारायण पेठ, लोखंडे तालीम- पत्र्या मारुती रस्ता पुणे-३. फोन- ४९००८३.

## आमची इतर लोकप्रिय प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| सौंदर्य टिप्स | सौ. पुष्पा जाजू | वीस रुपये |
| १०१ औषधी वनस्पती | डॉ. सौ. निर्मला सारडा | चाळीस रुपये |
| रुची (४०० शाकाहारी पदार्थ) | सौ. पुष्पा जाजू | पन्नास रुपये |
| कोण कुणाचं? | डॉ. सौ. निर्मला सारडा | वीस रुपये |
| सुखी शांत समृद्ध जीवनाची कला (चिंतन) | ह. ल. रानडे | सत्तर रुपये |
| घरी एकच पणती (आत्मचरित्र) | प्राचार्य आ. भा. मगदूम | सत्तर रुपये |
| वाहत्या वाऱ्यासंगे (ललित लेख) | प्रा. शैला लोहिया | साठ रुपये |
| शब्द मनातले (काव्य) | अतुल व्यंकटेश देशमुख | तीस रुपये |

# साहित्य वार्ता

**जीवनशैली बदलण्याची हृदयरुग्णांना गरज** – डॉ. उर्सेकर यांचे प्रतिपादन

जीवनशैलीत बदल केल्यास हृदयरुग्णांना पूर्वीप्रमाणेच निरोगी आणि कृतिशील जीवन जगता येईल, असे प्रतिपादन रुबी हॉल क्लिनिकच्या हृदयरुग्ण पुनर्वसन विभागाचे प्रमुख डॉ. डी. एस.उर्सेकर यांनी केले.

शुभदा गोगटे यांनी लिहिलेल्या 'हृदयविकार निवारण' या पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजच्या पदमजी सभागृहात हा कार्यक्रम झाला. डॉ. आशा प्रतिनिधी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. त्यांनी सांगितले, की मुळात तरुणांनी स्वत:ला योग्य सवयी लावून घेतल्या तर हृदयविकार टाळता येतात. उपचारांपेक्षा प्रतिबंध केव्हाही उत्तम. पुण्यातील विख्यात हृदयरोगतज्ञ डॉ. जगदीश हिरेमठ यांचेही या वेळी भाषण झाले. मेहता पब्लिशिंग हाऊसचे अनिल मेहता यांनी प्रास्ताविक केले. सुनील मेहता यांनी आभार मानले.

---

**दादा कोंडके यांच्या आत्मचरित्राचे प्रकाशन**

आपल्या हजरजबाबी व विनोदी वक्तव्याने संपूर्ण महाराष्ट्राला रिझवणारे मराठी चित्रपटसृष्टीतील दिवंगत कलाकार दादा कोंडके यांच्या 'एकटा जीव' या आत्मचरित्राचे प्रकाशन हिंदी चित्रपट सृष्टीतील सदाबहार अभिनेता देव आनंद यांच्या हस्ते पार पडले. मॅजेस्टिक प्रकाशनातर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या या आत्मचरित्राचे शब्दांकन सिनेपत्रकार अनिता पाध्ये यांनी केले असून या पुस्तकात दादा कोंडके यांनी स्वत: सांगितलेल्या व ध्वनिमुद्रित केलेल्या व्यक्तिगत व व्यावसायिक जीवनप्रवासाचे चित्रण आहे. या पुस्तकाचे प्रकाशन करताना देव आनंद यांनी, या आत्मचरित्राच्या रूपाने दादा कोंडके या मेहनती कलाकाराला खऱ्या अर्थाने श्रद्धांजली वाहण्यात आली आहे, असे उद्‌गार काढले. साधेपणाने पार पडलेल्या या प्रकाशन समारंभात दादा कोंडके प्रतिष्ठानचे विश्वस्त डॉ. अनिल वाकरणकर, सल्लागार हांडे-पाटील, मॅजेस्टिकचे अशोक कोठावळे, विजय पाध्ये आदी मान्यवर उपस्थित होते.

---

**वारकऱ्यांना स्वस्तात 'तुकाराम गाथा'**

वारकऱ्यांना तुकाराम गाथा स्वस्त दरामध्ये उपलब्ध व्हावी यासाठी शासनाच्या वतीने २५ लाख रुपयांचे अनुदान देण्यात येत आहे. यापैकी ५ लाख रुपये देहू संस्थानला दिले असून त्याशिवाय दहा लाख रुपये लवकरच देण्यात येतील असे उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे यांनी देहू येथे सांगितले.



संत तुकाराम महाराज वैकुंठगमन त्रिशकोत्तर सुवर्ण महोत्सव सांगता समारंभ देहू येथे उपमुख्यमंत्री श्री.मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

तुकाराम महाराजांनी सामान्य कष्टकरी माणसाला समजेल अशा सहज सोप्या भाषामध्ये अभंग रचले. त्यातून माणसाला व्यवहार सहजपणे कळला. संत तुकाराम महाराजांची भक्ती अगाध व शक्तिशाली होती. विज्ञानाने आजवर केलेली प्रगती ही त्यांनी ३५० वर्षांपूर्वी अभंगांच्या माध्यमातून साऱ्या समाजाला दिली होती. अभंगाच्या माध्यमातून तुकाराम महाराजांनी कष्टकरी माणसाला भक्तीमार्गाला लावले. ही वारकरी परंपरा महाराष्ट्राची संस्कृती जतन करीत असल्याने तुकाराम गाथा प्रत्येक वारकऱ्याच्या घरामध्ये असणे जरुरीचे आहे. ही गाथा त्यांना स्वस्त दरामध्ये मिळावी म्हणून शासनाच्या वतीने २५ लाख रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला.

---

**स्मिता शास्त्री यांना मराठी विषयात पीएच.डी.**

स्मिता चंद्रशेखर शास्त्री यांनी 'मराठी नाटकातील वृद्धांच्या चित्रणाचा चिकित्सक अभ्यास, कालखंड १९८० ते १९९०' या शोध प्रबंधास अमरावती विद्यापीठाने पीएच.डी. पदवी दिली. या शोध प्रबंधात त्यांनी वृद्धांच्या समस्येचा समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय, शरीरशास्त्रीय, आर्थिक, कौटुंबिक, विधिविषयक अंगांनी अभ्यास केलेला आहे. वृद्धांच्या संदर्भात मराठी विषयात या प्रकारचा अभ्यास प्रथमच झालेला आहे.

---

**सुसंस्कृत समाज साहित्य घडवितो- गोपीनाथ मुंडे**

कुठलाही सुसंस्कृत समाज हा साहित्याने घडत असतो. जेव्हा जेव्हा समाज गुलामगिरीत गेला; तेव्हा समाजाला साहित्य हे जागे करण्याचे काम करीत असते, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री ना. गोपीनाथ मुंडे यांनी केले. ते डॉ.रोहिदास वाघमारे यांच्या 'सदाफुली' या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन समारंभात बोलत होते.

ना. मुंडे पुढे म्हणाले की, वैद्यकीय पेशाचे आपले कर्तव्य पार पाडून डॉ. वाघमारे यांनी समाजमनाची स्थित्यंतरे आपल्या काव्यात टिपली आहेत. त्यांचे काव्य पारंपरिक वाट सोडून पुरोगामी युगाचे प्रतिनिधित्व करते. मुंबई येथील ऑलब्लेस रुग्णालयात आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सांस्कृतिक पाहुण्या म्हणून मुंबई विद्यापीठीच्या कुलगुरू डॉ. स्नेहलता देशमुख होत्या.

---

**मराठीचा वापर टाळणाऱ्यांवर बहिष्कार घालावा : नार्वेकर**

महाराष्ट्रात विकल्या जाणाऱ्या विविध वस्तूंचे वेष्टन आणि लेबल यांच्यावर इंग्रजी, उर्दू व अरबी या भाषांचा वापर केलेला आढळतो. मात्र मराठीचा वापर केलेला आढळत नाही. उत्पादक कंपन्या आकसाने किंवा दुराग्रहाने मराठीचा वापर करीत नसतील तर त्यांच्याविरुद्ध बहिष्काराचे हत्यार उपसले पाहिजे, असे 'सकाळ' (मुंबई)चे संपादक आणि

जागतिक मराठी अकादमीचे कार्याध्यक्ष राधाकृष्ण नार्वेकर यांनी सांगितले.

राज्य मराठी विकास संस्थेचा 'लोकवैद्यक' हा उपक्रम आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या वतीने 'वैद्यक पत्रकारिता' या विषयावर २२ ते २७ फेब्रुवारी या कालावधीत अभ्यास शिबिर घेण्यात आले. या अभ्यासवर्गाचा समारोप श्री. नार्वेकर यांच्या हस्ते झाला. वैद्यक क्षेत्रात मराठीचा वापर व्हावा यासाठी पत्रकारांनी फारसे काही केले नाही, अशी खंत नार्वेकर यांनी व्यक्त केली; परंतु वैद्यक क्षेत्रात मराठीचा वापर वाढावा यासाठी 'लोकवैद्यक' च्या माध्यमातून डॉ. सुरेश नाडकर्णी व त्यांचे सहकारी करीत असलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांनी गौरवोद्‌गार काढले.

वैद्यक शिक्षण, वैद्यक वृत्ताची परिभाषा वैद्यकीय वृत्ताची आवश्यकता, पत्रकारितेच्या संदर्भातील महत्त्वाचे विषय, वैद्यकीय शाखांची माहिती, वैद्यक आणि प्रसारमाध्यमे, आकस्मिक संकट व प्रतिबंध यांचे वृत्तसंकलन, उपचार-सुविधांच्या प्राप्तीसाठी आवश्यक प्रक्रिया, मराठीतील वैद्यक लिखाणाचा आढावा, शुद्धलेखन तसेच वैद्यक आणि कायदे या विषयांवर तज्ज्ञांची व्याख्याने झाली. डॉ. किशोर कुलकर्णी, डॉ. मनोहर खरे, डॉ. चंद्रकांत वागळे, डॉ. लीना देवधर, वि.ना देवधर, डॉ. देशपांडे, श्री. सोमनाथ पाटील, डॉ. अश्विनी भालेराव, डॉ. आनंद जोशी आणि डॉ. अरुण बाळ या सर्वांनी या अभ्यास शिबिरात मार्गदर्शन केले.

---

## विज्ञानाविषयी सोप्या भाषेत माहितीपूर्ण लिखाण गरजेचे

आंतरविद्यापीठ खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकी केंद्राने (आयुका) 'विज्ञान आणि प्रसारमाध्यमे' या विषयावर चर्चासत्र घेतले डॉ. अजित केंभावी, डॉ. प्रकाश तुपे, के. आर. पी. मोहन, डॉ. के. मंजुळा, एन. के. सेहगल आणि डॉ. बाळ फोंडके यांनी त्या सत्रात भाग घेतला.

''सर्वसामान्यांना समजेल अशा साध्या-सोप्या; परंतु माहितीपूर्ण अशा स्वरूपात विज्ञान आणि तंत्रज्ञानासंबंधीचे लिखाण होणे गरजेचे आहे. त्यासाठी विज्ञान आणि माध्यम या दोन्ही क्षेत्रांनी एकत्रित येऊन प्रयत्न करायला हवेत,'' असे मत एका चर्चासत्रात व्यक्त केले गेले. ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि 'आयुका'चे संचालक डॉ. जयंत नारळीकर यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्‌घाटन झाले.

''विज्ञान आणि तंत्रज्ञानाबाबत सर्वसामान्यांना अगदीच अनास्था आहे, असे नाही. किंबहुना या क्षेत्रातील घडामोडी सुलभ आणि रंजक स्वरूपात लिहिल्या गेल्या, तर त्या वाचल्या जातात. प्रसारमाध्यमांनी ही नोंद घेणे गरजेचे आहे.''

''विज्ञानाविषयी अधिकाधिक लिखाण झाले आणि ते स्थानिक भाषेतून झाले, तर विज्ञानप्रसारासाठी ते उपयुक्त ठरेल,'' असे डॉ. तुपे यांनी सांगितले. प्रादेशिक भाषांतून विज्ञानविषयक लिखाण करतानाचे अनुभव त्यांनी तसेच श्री. मोहन यांनी नमूद केले.



विज्ञानासाठी प्रामुख्याने इंग्रजी भाषेवरच स्रोत म्हणून अवलंबून राहावे लागते; मात्र भाषांतर करताना विज्ञानाच्या संकल्पनेला बोजड प्रतिशब्द दिला जाऊ नये.''

''प्रसारमाध्यमांतून विज्ञानाचे लिखाण करताना, प्रसारमाध्यमाची म्हणून जी गरज असते, ती शास्त्रज्ञांनी पूर्ण करणे गरजेचे आहे,'' असे डॉ. मंजुळा यांनी सांगितले.

डॉ. बाळ फोंडके म्हणाले, ''विज्ञान आणि प्रसार माध्यम या क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्तींच्या उद्दिष्टांत साम्य आहे. लोकांना माहिती देणे, लोकप्रबोधन करणे ही कामे या दोन्ही क्षेत्रांद्वारे होत असतात. असे असूनही या दोन्ही क्षेत्रांत एक प्रकारची दरी आहे. परस्परांमधील आदराची भावना वाढवून व सहकार्य प्रस्थापित करून ही दूरी दूर करता येईल.''

''विज्ञानाशी संबंधित विषय सर्वसमान्यांपर्यंत पोचणे आवश्यक आहे; मात्र त्यासाठी आक्रमक दृष्टिकोन वापरून चालणार नाही,'' असे डॉ. नारळीकर त्यांनी नमूद केले.

---

## 'अक्षरबाग' मध्ये कवितेचा आनंद देणारे सूत्र : पाडगावकर

कविवर्य कुसुमाग्रजांच्या या 'अक्षरबाग' पुस्तकाच्या रूपाने एक महत्त्वाचा दृष्टिकोन लाभले असे मत सुप्रसिद्ध कवी मंगेश पाडगावकर यांनी व्यक्त केले. हे फक्त कवितांचे पुस्तक नसून कवितेचा आनंद देणारे सूत्र 'अक्षरबाग' मध्ये आहे, असेही ते म्हणाले. माझ्या हाती कविवर्यांचे पुस्तक पडले तेव्हा ७० वर्षांचा असूनही मी हे पुस्तक १० वेळा लहान बाळ होऊन वाचले. कुसुमाग्रजांच्या कवितेचा हात धरून माझी कविता चालायला शिकली. कविता ही प्रेम करण्याची गोष्ट आहे. कवितेवर प्रेम करतो तोच माणूस असतो आंतरिक फुलणे कवितेतून मिळते. या पुस्तकाच्या रूपाने कुसुमाग्रजांनी बालमित्रांना काव्याच्या अद्‌भूत जगात नेले आहे, असेही ते म्हणाले.

'अक्षरबाग' पुस्तकात प्रत्येक अक्षराची ओळख करून देण्यात आली आहे. त्या बरोबर त्या शब्दाच्या नावाच्या लेखकाचे व महनीय व्यक्तीचे रेखाचित्र या अक्षराखाली आहे. 'ख' अक्षराखाली सुप्रसिद्ध साहित्यिक वि.स. खांडेकर यांचे, 'ध' अक्षराखाली महर्षी धोंडो केशव कर्वे इत्यादी-इत्यादी परंतु 'ठ' अक्षराचा उल्लेख आला तेव्हा कवी मंगेश पाडगावकर म्हणाले की, तुमच्या मनात असलेले रेखाचित्र 'ठ' अक्षराखाली नाही तर 'ठ' अक्षराखाली बालकवी ठोंबरे यांचे रेखाचित्र आहे. पाडगावकरांनी ही कोटी करताच श्रोत्यांनी त्यांना जबरदस्त दाद दिली.

---

## रहस्यमय वाङ्‌मय वाचल्याने विकृती निर्माण होत नाही

''रहस्यमय वाङ्‌मय वाचून विकृती निर्माण होत नाही, तर ती माणसातील एक प्रवृत्ती आहे,'' असे मत रहस्यकथाकार सुहास शिरवळकर यांनी व्यक्त केले. डहाणूकर कॉलनीतील ज्येष्ठ नागरिक संघाने आयोजिलेल्या साहित्यिक गप्पांच्या कार्यक्रमात

ते बोलत होते.

आपल्या लेखनप्रवासाबद्दल बोलताना श्री. शिरवळकर म्हणाले, "रहस्यकथाकार गुरुनाथ नाईक यांच्यामुळे मी रहस्यकथा लिहिण्यास प्रवृत्त झालो. मात्र फक्त रहस्यकथांमध्येच न अडकता वेगळे विषयही मी हाताळले. तरीही रहस्यकथाकार हा शिक्का कायम राहिला. समकालीन साहित्याचे समीक्षण होते तेव्हा ते कदाचित पूर्वग्रहदूषित असू शकते. मात्र पन्नास वर्षांनंतर त्याचे खऱ्या अर्थाने समीक्षण होते. याचाच अर्थ ते साहित्य पन्नास वर्षे टिकलेले असते, शाश्वत असते."

## प्रत्येक आत्मचरित्र पूर्णतः प्रांजळ नसते

"आत्मचरित्र पूर्णतः प्रांजळ असतेच असे नाही. यातील काही भाग काल्पनिक तसेच दांभिकही असतो," असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. गंगाधर गाडगीळ यांनी जळगाव येथे केले.

अरुणोदय ज्ञानप्रसारक मंडळ संचलित कला व वाणिज्य महिला महाविद्यालयातर्फे 'स्त्री-पुरुष आत्मचरित्रातील प्रांजळता : एक शोध' या विषयावर विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहकार्याने चर्चासत्र घेण्यात आले.

दुपारच्या सत्रातील चर्चासत्रात नऊ प्राध्यापकांनी स्त्री-पुरुष आत्मकथनातील प्रांजळता' या विषयाशी निगडित शोधनिबंध सादर केले. चर्चासत्राचे उद्घाटन नगराध्यक्ष सिंधू कोल्हे यांनी केले. या वेळी संस्थेचे खजिनदार प्रा. बी. एम. महाजन, डॉ. शंकर पुणतांबेकर, प्रभारी प्राचार्य जयश्री बऱ्हाटे आदी उपस्थित होते. प्राचार्या जंगले यांनी चर्चासत्रामागची भूमिका विशद केली. प्रा. डॉ. मुक्ता महाजन व प्रा. सौ. प्रभावती महाजन यांनी सूत्रसंचालन केले.

## डॉ. सुरेश नगर्सेकर लिखित वैद्यक शास्त्रावरील पुस्तकांचे प्रकाशन

सुप्रसिद्ध आयुर्वेद चिकित्सक आणि पत्रकार डॉ. सुरेश नगर्सेकर यांनी लिहिलेल्या मनोरमा प्रकाशनाच्या 'रोगांचा काळ-रामबाण' 'मुद्रा विज्ञानातील बिन पैशाची चिकित्सा' आणि सुजोक उपचार पद्धती या तीन पुस्तकांचे प्रकाशन मुख्यमंत्री नारायण राणे यांच्या हस्ते वर्षा निवासस्थानी करण्यात आले.

डॉ. नगर्सेकर यांनी लिहिलेली अल्पमोली-बहुगुणी ही २ पुस्तके यापूर्वी प्रसिद्ध झाली होती व त्याला वाचकांचा चांगला प्रतिसाद लाभला होता. त्यांच्या या उपक्रमाबद्दल मुख्यमंत्री नारायण राणे यांनी समाधान व्यक्त केले व शुभेच्छा दिल्या. या प्रकाशन सोहळ्यात ज्येष्ठ पत्रकार आणि 'रत्नागिरी टाइम्स'चे मुंबई निवासी संपादक यशवंत पाध्ये तसेच शिवसेना कुडाळ तालुका संपर्क प्रमुख दयानंद चौधरी, सूर्यकांत म्हसकर, सुरेंद्र माने प्रभृती मान्यवर उपस्थित होते.



## 'भारतीय साहित्य हा प्रकार निश्चितच अस्तित्वात आहे'

श्रद्धांमधील वैविध्य, भारतीय उपखंडात दिसणारी जातीव्यवस्था आणि निसर्गाबाबतचे सर्वसाधारण समाजमन यांचे प्रतिबिंब साहित्यात दिसत असल्यामुळे भारतीय साहित्य हा प्रकार निश्चितच अस्तित्वात आहे, असे प्रतिपादन प्रा. के. ज. पुरोहित यांनी 'भारतीय साहित्याचा भारतीयपणा' या विषयावर बोलताना केले.

पुरोहित यांच्या म्हणण्याप्रमाणे भारतात अनेक भाषा, संस्कृती, जाती, धर्म आहेत. या विविध भाषा, पंथातील साहित्यप्रकारांना भारतीय म्हणण्यासारखे काही समान धागे त्यात सापडतात. उदाहरणार्थ : अंगाभोवती कापड गुंडाळणे, (शिवलेल्या कपड्यांचा वापर भारतात नंतर करण्यात येऊ लागला.) श्रद्धांमधील वैविध्य, भारतीय उपखंडात दिसणारी जातीव्यवस्था, निसर्ग हाच खरा, व सुंदर असल्याचे मानणारे भारतीय उपखंडातील सर्वसाधारण समाजमन आदी गोष्टी या उपखंडातील साहित्यप्रकारात आढळतात. त्यामुळे भारतीय साहित्य हा प्रकार अस्तित्वात असल्याचे ठाम प्रतिपादन आपल्याला करता येते. भारतीय समाजमनावरील सरंजामी विचारांचा पगडा कायम आहे. राष्ट्राशी असणाऱ्या निष्ठेपेक्षा व्यक्ती वा एखाद्या घराण्याशी असणारी निष्ठा आपल्याला महत्त्वाची वाटते हा एका सरंजामी व्यवस्थेकडून दुसऱ्या सरंजामी व्यवस्थेकडील प्रवास असल्याचे मत रा. भा. पाटणकर यांनी आपल्या 'विचारप्रणाली व साहित्य' या निबंधात व्यक्त केले.

रा. भा. पाटणकर यांच्या मते, इंग्रज आल्यानंतर त्यांनी केलेले शोषण येथील जनतेला जाचक वाटतच नव्हते. कारण त्या आधीच्या सत्ताधाऱ्यांकडून येथील जनतेवर अपरिमित अत्याचार होत होते. जनतेची ब्रिटिश शासनाबाबत नोंदविलेली मते सांगताना लोकहितवादी यांनी सांगितले की, पूर्वीच्या हिंदू शासकांमध्ये पाच टक्के लोक चांगले होते, तर इंग्रजी शासकांमधील अवघे पाच टक्के लोकच वाईट आहेत. हे दाखले देत पाटणकर यांनी इंग्रजी राजवटीतील शोषणाची पद्धत ही व्यक्तिगत शोषणाची नसून व्यवस्थेचा भाग म्हणून इंग्रजांनी शोषण केल्याचे सांगितले.

इंग्लंड व फ्रान्स येथे उत्पादन पद्धतीतील बदलातून नवे विचार आले. विशेषतः राष्ट्रवादाची कल्पनाही यातूनच आली, असे सांगून पाटणकर म्हणाले की, भारतात मात्र नवी उत्पादन पद्धती अस्तित्वात आल्याशिवायच इंग्रजांच्या आगमनामुळे नवे विचार आले. त्यामुळे मूल्य व्यवस्थेचा पाया कच्चाच राहिला व त्या पायावर उभा राहिलेला इमला काळाच्या कसोटीवर उतरू शकला नाही.

आपल्या भाषणात म्हणाले की, साहित्यामधूनच त्या त्या काळातील समाजवैशिष्ट्ये नोंदविली जात असतात. त्यामुळे साहित्य व इतिहास यांचा परस्परसंबंध अत्यंत गाढा आहे. महत्त्वाचे ऐतिहासिक दस्तावेज म्हणून गणल्या गेलेल्या पुस्तकांनाही साहित्यिक मूल्य असावेच लागते.

ज्या ऐतिहासिक पुस्तकांना साहित्य मूल्य असते तीच पुस्तके काळाच्या कसोटीवर

उतरतात, उरलेली पुस्तके काळाच्या ओघात विरून जातात, 'राइज ॲण्ड फॉल ऑफ द रोमन एम्पायर' या गिबन यांच्या पुस्तकाला अत्यंत उच्च दर्जाची साहित्य मूल्ये असल्यानेच हे पुस्तक काळाच्या कसोटीवर उतरले. रोमन साम्राज्याबद्दल अनेक ऐतिहासिक पुस्तके आली व गेली, मात्र हे पुस्तक तेवढे टिकून राहिले, असे ते म्हणाले.

## अक्षरगंधचा काव्यविशेषांक

मधुवंती सत्रे यांनी 'अक्षरगंध'हा अभिजात चळवळ करणारी संस्था १९९७ पासून चालवली आहे. पन्नासाव्या कविता वाचनाच्या प्रयोगाच्या निमित्ताने 'अक्षरगंध' हा १०० पृष्ठांचा भरगच्च अंक प्रसिद्ध केला आहे. या अंकात विजय तेंडूलकरांनी लेखक आणि त्याचा भाविक वाचक यांच्यातील सवयीचे विलक्षण समजूतदार नाते कसे निर्माण होते आणि ते एकमेकांना कसे तृप्त करीत जाते यावर एक छोटेसे टिपण लिहिले आहे. शंकर सारडा यांनी पाश्चात्य कवितेचा मराठी कवितेवरील प्रभाव स्पष्ट केला आहे. माधव गडकरी यांनी आवडत्या कवींवर लिहिले आहे. दीपक घारे यांनी बापट-पाडगावकर-करंदीकर या तिघांच्या काव्यावर व काव्यवाचनावर लेख दिला आहे. सुभाष भेंडे, यशवंत देव, श्री निवास खळे, रवींद्र पिंगे, नंदिनी आत्मसिद्ध राजीव जोशी यांचेही लेख माहितीपूर्ण आहेत. केशवसुत, गोविंदाग्रज, बालकवी, तांबे, माधव जूलियन, अनिल, बहिणाबाई, बोरकर, माडगूळकर, मर्ढेकर यांच्या निवडक कविताही दिल्या आहेत. संग्राह्य असा हा अंक आहे. देणगी मूल्य ५० रुपये. संपादक मधुवंती सप्रे. ४ सिंडिकेट अपार्टमेंट, हनुमान क्रॉस रोड नं. २, विलेपार्ले पूर्व, मुंबई ५७ फोन - ८२३४७४२.

**T बुक क्लब**चे आजच सभासद व्हा व उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किंमतीत मिळवा.

**सभासद फी - फक्त २०रु.**

**या वर्षीच्या क्लब ८ मधील ४ पुस्तके उपलब्ध!**

| | | | मूळ किंमत | सभासदांना |
|---|---|---|---|---|
| १) | डिस्क्लोजर | अनु.: माधव कर्वे | २२०रु. | ११०रु |
| २) | द हॉट झोन | अनु.: डॉ. प्रमोद जोगळेकर | २००रु. | १००रु. |
| ३) | द प्रॉडिगल् सन् | अनु.: मंगला निगुडकर | २००रु. | १००रु. |
| ४) | नॉट अ पेनी मोअर, नॉट अ पेनी लेस | अनु.: अंजनी नरवणे | १२०रु. | ६०रु. |

*संपर्क :* मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०.



**''प्रत्येकाला महत्त्वाकांक्षा असलीच पाहिजे व त्यानं माणसाची मनं ओळखलीच पाहिजेत. मी स्वतःला मार्ग शोधणारा समजतो. जंगलाचा तपास घेत मी भावीकाळात दुसऱ्यांना चालत जाता यावं म्हणून वाट तयार करतो. कोणतंही काम हाती घेताना त्या क्षेत्रात ते काम करणारी पहिलीच व्यक्ती आपण असलो पाहिजे असं मला वाटतं. माझ्या भागधारकांसाठी पैसा मिळवणं गरजेचं असलं तरी त्यामुळे मला फार उचंबळून येत नाही. काही तरी कर्तृत्व करून दाखवल्यानं मला खरा आनंद होतो. सर्वसाधारण काम करणं मला जमत नाही. माझ्या या दालनात अभूतपूर्वच गोष्टी घडायला हव्यात. आपण पहिल्या क्रमांकावर आहोत की नाही याला मी फारसं महत्त्व देत नाही. मी पूर्वी कोणीच नव्हतो - एक छोटा व्यापारी होतो इतकंच. आता मी या स्थानावर येऊन पोचलो त्याबद्दल मी स्वतःला सुदैवी मानतो. पण मला त्याचा गर्व वाटत नाही. पूर्वी मी जसा होतो तसाच आजही आहे.''**

***—धीरुभाई अंबानी***

**याप्रमाणेच आठ उद्योगपतींच्या उत्तुंग यशाचे झळाळते आलेख**

*मूळ लेखक :* ***गीता पिरामल***
*अनुवाद :* ***अशोक जैन***
*किंमत :* ***दोनशेपन्नास रुपये***
*सवलत :* ***दोनशे रुपये***

**T बुक क्लबच्या व मेहता मराठी ग्रंथजगतच्या सभासदांना १८८रु. पोस्टेज १५रु फक्त**

**आपली मागणी लवकरात लवकर नोंदवा.**

# पुस्तक परिचय

**नेताजींचा तीतया?**
**एका आंतरराष्ट्रीय कारस्थानाची**
**नाट्यपूर्ण कहाणी**

## ऑपरेशन गुलमोहर

**मूळ लेखक : आबिद सूरती**
**अनुवाद : शरयू पेडणेकर**

नेताजी सुभाषचंद्र बोस यांना १८ ऑगस्ट १९४५ रोजी तैवानमधील ताईहोकू विमानतळावर झालेल्या अपघातात मृत्यू आला ही घटना स्वीकारायला आजही काही भारतीय व्यक्ती तयार नाहीत. नुकतीच संसदेत त्यावर चर्चा झाली. शालमौरी आश्रमातील शालमौरीबाबा म्हणजे नेताजीच आहेत; तुलसीबाबा हे नेताजी आहेत असे म्हणून आझाद हिंद सैनिकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न पूर्वी झाला. परंतु त्याबाबत भ्रमनिरासच पदरी पडला. १९६४ मध्ये पटना येथे व इतर शहरांमध्ये नेताजी जिवंत आहेत आणि ते अमुक दिशी प्रकट होणार आहेत अशी भित्तीपत्रे लागली. पटना येथे सभेच्या दिवशी नेताजी आले नाहीत; ती सभा उधळली गेली. संयोजकांची त्रेधातिरपीट उडाली. परंतु त्याच दिवशी कर्नल गुलमहमद याच्या बाशी येथील घरी नेताजी येतात; आणि १९३८ साली काँग्रेस अध्यक्ष म्हणून निवडून आल्यावर एक दिवस याच घरात त्यांनी घालविलेला असतो, त्याचे स्मरण ठेवून सराईतपणे त्या घरात १९६४ मध्येही वावरतात; गुलमहमदचा मुलगा, बायको, एवढेच नव्हे तर त्याच्या घरच्या मांजरीच्या पिलांचीही चौकशी करतात; तेव्हा गुलमहमदला हेच खरे नेताजी– वय ६७ हे स्वीकारणे भाग पडते. इतकी वर्षे तुम्ही कुठे होता याचे उत्तर ते देतात– रशियात. सैबेरियामधील कारावासात. हे उत्तर देऊन ते गुलमहमदला सांगतात, ''सर्व लेखन साहित्य येथे आण. टाइपरायटर इ. आझाद हिंद फौजेचे अधिकारी, कार्यकर्ते, जवान यांची यादीही तयार



कर. पत्ते मिळव. मला त्यांच्याशी संपर्क साधायचा आहे.''

कलकत्ता येथे पुढच्याच आठवड्यात नेताजींच्या पुण्यतिथीच्या सभेचे आयोजन होते आणि नेताजी त्या सभेत खरोखरच येतात; आणि भाषण करतात. ''माझ्या मृत्यूची बातमी ऐकून तुम्ही चिंताग्रस्त झाला असाल, पण आपण मनापासून या बातमीचा स्वीकार केला नाही... आपल्या मनात नाना तऱ्हेच्या शंका निर्माण झाल्या. असतील... खरंच नेताजी मृत्यू पावले आहेत?... इतकी वर्षं मी कुठं होतो?... आयुष्यातील अमूल्य वीस वर्षं सैबेरियाच्या तुरुंगात घालवून मी आज तुमच्यासमोर उभा आहे. हिंदुस्थानात प्रवेश करण्याचा मला जन्मसिद्ध अधिकार आहे. पण माझा नाइलाज होता...''

सारेच लोक व्यासपीठाकडे धावू लागतात. नेताजींना स्पर्श करण्यासाठी गर्दी करू लागतात. तेव्हा त्या गर्दीतून सुरक्षितपणे बाहेर काढण्यात येते. दीड लाख लोकांना आवरणे काही सोपे नसते. सहा जण चेंगराचेंगरीत मरण पावतात.

या घटनेने दिल्लीतील रशियन दूतावासातील राजदूत झखारोव खडबडून जागे होतात. ते केजीबी या रशियन गुप्तहेर यंत्रणेचे अधिकारी युरी उलानोव याला बोलावून घेतात. तरुण युरी सहा फूट तीन इंच उंच. भेदक डोळे, सोनेरी केस. उन्नत कपाळ. हिंदी भाषेवर प्रभुत्व. तीस वर्षांचे प्रशिक्षण देऊन, त्याला भारतात पाठवण्यात आलेले असते. भारतीयांबरोबर मैत्री करून, निर्दोष लोकांना जाळ्यात अडकवून त्यांच्याकडून रशियासाठी हेरगिरी करून घ्यायची हे त्याचे मुख्य काम. भारतात दीड वर्ष राहून गेलेली फाइना सोलास्की ही रशियन तरुणी ही त्याची शिक्षिका होती. तिने त्याला सांगितलेले असते. ''आपण जे काही करीत आहोत ते मानवसमाजासाठी! विश्वमानवाची प्रकृती ठीक राहावी म्हणून. शरीरावर शस्त्रक्रिया करून रोगट भाग काढून टाकतो. त्याप्रमाणे हेरगिरीतही कधी कोणाला पळवावे लागते, मारावे लागते. असे नाही केले तर मानवसमाज कॅन्सरच्या गाठीसारखा बनेल.'' युरीच्या भारतीयीकरणाच्या प्रक्रियेसाठी त्याला जुने नवे भारतीय चित्रपट दाखवण्यात आले. राजकीय पक्ष, नेते, भारतीय रीतिरिवाज, ज्युडो-कराटे, मायक्रोफोटोग्राफी, अदृश्य शाईतील लेखन, सांकेतिक भाषा. इ. इ.

रशियाचे राजदूत युरीला कलकत्त्याला जाऊन चौकशी करून ये असे सांगतात. नेताजी जर परदेशातून आले असतील तर त्यांच्याजवळच्या पासपोर्टची मायक्रोफिल्म मिळवायला हवी. सैबेरियात ते खरोखर होते का? तेथून ते पळाले असले तर नंतर कुठे गेले असणार? कोणी त्यांना आश्रय दिला? कोणी मदत केली?''

यूरी त्याच वेळी राजदूताला सांगतो, ''दूतावासावरील बंदोबस्त वाढवा. लोकांचा मोर्चा आल्यावर धावपळ होईल. मोडतोड होईल. १९ वर्षे सुभाषबाबूंना रशियाने सैबेरियात जेलमध्ये ठेवले हे ऐकून फॉरवर्ड ब्लॉकचे सदस्य गप्प बसणार नाहीत.'' हे

ऐकल्यावर राजदूतांना अक्षरश: घाम फुटतो.

इकडे भारताच्या सेंट्रल ब्युरो ऑफ इंटेलिजन्सच्या गुप्तचर कार्यालयातही खळबळ उडालेली असते. "हे नेताजी कोण? हा तोतया नेताजी कोण?"

हिप्पी थाटातल्या केशभूषेत व पोशाखात वावरणारा सीबीआयमधील तरुण अधिकारी आलोक गुप्ता आपले बॉस शिवेन सिन्हा यांना सांगतो, "हा उलगडा करण्यात मी असफल झालो तर नुसते केसच कापणार नाही, तर चमनगोटा करीन. मिशाही सफाचाट करीन."

या आलोकवर प्रेम करणारी मुक्त पत्रकार अनिता साराभाई ही पत्रकारिता व संशोधन यातही स्वत:चे स्थान कमावलेली तरुणी असते. "नेताजींविषयी माझ्याजवळ जितकी माहिती आहे, तितकी इतर कोणाकडे क्वचितच सापडले." असे आत्मविश्वासपूर्ण उद्‌गार ती काढते तेव्हा त्यामागे तिचा व्यासंगच बोलत असतो. आझाद हिंद फौजेवर तिचे प्रबंधलेखन चालू असते.

युरी आलोकशी संपर्क साधतो. "अमुक ठिकाणी निरोप ठेव. मला मिळेल." संकेत ठरतो.

–असा पट मांडून कादंबरीकार आबिद सुरती यांनी 'ऑपरेशन गुलमोहर' या थरारकथेतील नाट्यात्मकता वाढवली आहे. ही कादंबरी नेताजींच्या जीवनावर नाही तर १९६४ साली नेताजी म्हणून भारतात येऊन आपल्या मायाजालात नेताजीभक्तांना ओढू पाहणाऱ्या तोतयाची ही कहाणी आहे. आणि तिच्यात आंतरराष्ट्रीय स्तरावरचे राजकारण, गुप्तहेरांचे डावपेच यांना महत्त्व आहे.

कर्नल गुलमहमद यांच्या कॉटेजमध्येच नेताजींचा मुक्काम असतो. दुसऱ्याच दिवशी त्या कॉटेजमधील सगळ्या वस्तू अस्ताव्यस्त झालेल्या दिसतात. गाद्या चिरलेल्या असतात. सूटकेसेस उघड्या पडलेल्या दिसतात. नेताजी गुलमहमदला सांगतात, "ही नुसती सुरुवात आहे... या वेळी आपली शत्रू परदेशी नाही. आपलेच बांधव आहेत.. या झडतीमागे केजीबीचाच हात असणार. सीआयएच्या हेरगिरीत कौशल्य असते. सीबीआयचे लोक माझ्याकडे भक्त म्हणून येतात. स्वाक्षरी मागतात. असली आडदांड अस्ताव्यस्तपणा रशियनच करू जाणतात."

त्याच दिवशी वृत्तपत्रात बातम्या असतात.

सुभाष बाबूंचे स्वागत करताना माझे हृदय आनंदाने नाचत आहे– पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री.

सुभाषबाबू नावाचा कोणीही कैदी रशियाच्या कारागृहात नव्हता. तसा आरोप कोणीतरी करावा. यामुळे रशियन सरकारला दु:ख व काळजी वाटते– रशियन राजदूत.

अनिता बाशीला जाऊन सुभाषबाबूंच्या पत्रकार परिषदेला हजेरी लावते. एका



ऐंशी वर्षे वयाच्या पत्रकाराला नेताजी विचारतात, "तुम्ही भट्टाचार्य ना? स्टेटसमनमध्ये तुम्ही होता. त्याआधी मंडाले तुरुंगात." भट्टाचार्य पार भुईसपाट! चीनमधून आपण पाणबुडीनं आलो असे नेताजी सांगतात.

"त्याला पुरावा?"

"माझा शब्द."

"सैबेरियात तुम्ही होता. हे सुद्धा पुराव्याशिवाय मानायचं? तुमचा शब्द म्हणून?"

"नाही. एकोणीस जुलैला मी तुरुंग फोडला. प्रावदाच्या २० जुलैच्या अंकात संक्षिप्त वृत्त आहे. मी युकुत्स तुरुंगात ४५ क्रमांकाच्या बॅरॅकमध्ये होतो."

"आपण आपल्या घरी न जाता कर्नलचे पाहुणे म्हणून का आलात?"

"माझ्या कुटुंबाबरोबरचे माझे संबंध संपुष्टात आले आहेत."

"केव्हापासून?"

"माझी पत्नी आणि मुलगी व्हिएन्नातून भारतात आल्या तेव्हापासून. त्यांनी माझ्या पत्नीचे व मुलीचे अस्तित्वच नाकारले."

"कारण?"

"माझी मुलगी माझ्या संपत्तीवर ताबा मिळवण्यासाठी आलीय अशी भीती त्यांना वाटली असावी."

"तुमचा भावी कार्यक्रम काय?"

"माझे सगळे प्रयत्न भारत एकसंध, अखंड व अविभाजित होण्यासाठी असतील."

अनिता शेवटी आपले प्रशन विचारले, "तुमच्या पंचवीस वर्षापूर्वीच्या आणि आजच्या चेहऱ्यात मला काही फरक दिसत नाही. आपल्या चेहऱ्यावर झालेल्या प्लॅस्टिक सर्जरीमुळे हे घडले काय?"

"बहन, तुम्हाला वाटते ते चुकीचं नाही. विमान अपघातात माझा चेहरा खूप भाजला होता. चेहऱ्यावर प्लॅस्टिक सर्जरी झालीय. हे खरे आहे."

अनिता साराभाईला नंतर नेताजी म्हणतात, "तुम्हाला पाहिलं आणि मला माझ्या मुलीची आठवण आली. पण मला हे ठाऊक नव्हतं की तुमचं नावही अनिता आहे." अनिता आलोकला आपले मत सांगते, "नेताजी तोतया नाहीत." आणि पत्रकार परिषदेच्या छायाचित्रांचा रोल त्याला देते.

त्याच वेळी एका सिक्युरिटी ऑफिसरचा रस्त्यावर खून झालेला आलोकला दिसतो. तो घरी येतो तर त्याच्या बंद घरात आत रक्तरंजित सुरी दिसते.

तो आपल्या प्रमुखांकडे ती सुरी घेऊन जातो. परत येतो तर त्याचा आचारी रक्ताच्या थारोळ्यात पडलेला. निगेटिव्हचा शोध करणारे दोन मारेकरी तेथे आले होते अशी माहिती तो आचारी देतो.

नेताजींचे बोटाचे ठसे मिळवून ते सीबीआय इंटरपोलकडे पाठवते. ते ठसे वुल्फ ब्रोनसार्ट नामक जर्मन खुनी गुन्हेगाराचे असतात असे कळवण्यात येते. हा जर्मन गुन्हेगार भारतात नेताजींच्या वेषात येण्याचे कारण काय असा प्रश्न आलोकला पडतो. पण इंटरपोलनेच पुढे कळवलेले असते की हा गुन्हेगार दोन वर्षांपूर्वीच क्युबात मरण पावलेला आहे. मग आपण जे ठसे इंटरपोलला पाठवले होते ते कोणाचे होते असा प्रश्न आलोक व त्याचे प्रमुख यांना सतावत राहणारच.

पण आलोकला त्याचे बॉस सांगतात, ‘‘नेताजी म्हणून वावरणारा हा माणूस तोतया आहे हे आपल्या लक्षात आले. आपल्या दृष्टीने हा तपास संपला.’’

आलोक विचारतो, ‘‘मी स्वत: आपला शोध पुढं चालू ठेवला तर?’’

‘‘तर तुझ्याविरुद्ध कारवाई केली जाईल.’’

‘‘तो तोतया आहे हे मी सिद्ध केलं तर–?’’

‘‘तुला त्यापासून लाभ कोणता? सगळा देश त्याला नेताजी मानतोय. तशात तू सीबीआयचा एक घटक... तू आपला हट्ट सोडून दे.’’

‘‘मग मी राजीनामा देतो.’’ आलोक निर्वाणीच्या सुरात सांगतो. आणि खरोखर राजीनामा देतोही!

अनिता त्याला म्हणते, ‘‘तू आता सीबीआयमध्ये नाहीस. मला भीती वाटते. आपलं प्रेम आता सुरक्षित नाही. तुझ्या पाठीशी आता सीबीआयचं बळ नाही. आज तू एकटा आहेस.’’

आलोक केजीबीच्या मदतीने परदेशात जाऊन या प्रकरणाचा छडा लावू पाहतो. वुल्फ ब्रोनसार्ट जर मेला असेल तर तोतयाचे ठसे त्याच्याशी मिळतेजुळते कसे हे त्याला शोधायचे असते. त्यासाठी परकीय चलन–केजीबीने उपलब्ध करून द्यावे अशी त्याची मागणी असते.

आणि त्याला अनिताच्या आईचा फोन येतो, ‘‘अनिता तुझ्याजवळ आहे का? अजून ती घरी कशी आली नाही?’’

अनिताला पळवले गेले असणार हे आलोकच्या लक्षात येते.

इकडे नेताजी बाशी ते दिल्ली पदयात्रा काढण्याचा कार्यक्रम जाहीर करतात. कलकत्ता येथे आपल्या आईला जाऊन भेटतात. जाहीर भाषण करतात. भ्रष्टाचाराविरुद्ध आंदोलनाची घोषणा करतात.

नेताजींना रात्री त्यांच्या विश्रांतीस्थळी आलोक गाठतो, आणि विचारतो, ‘‘वुल्फ, माझी अनिता कुठाय? तिला कुठं लावलंय?’’ तो त्या तोतयाला एक थप्पड मारतो. तर तो तोतया दुसरा गाल पुढं करतो. आलोक बुचकळ्यात पडतो. तो घरी येतो तर अनिता जखमी अवस्थेत दारासमोर दिसते...



अनिताला दवाखान्यात नेण्यात येते...

वाचकहो, अशी ही नाट्यपूर्ण प्रसंगांची रेलचेल असणारी थरारकथा वाचताना तुम्ही स्थळकाळाचे भान विसराल. या सर्व प्रकारामागे सूत्रधार म्हणून कोण सगळी सूत्रे हलवत होते? त्यामागे काय उद्दिष्ट होते? ते तुम्हीच स्वत: शोधून काढायला हवे.

शरयू पेडणेकर यांनी केलेला अनुवाद चांगला झाला आहे. वाचताना कुठेही हा अनुवाद आहे असे जाणवणार नाही इतका सफाईदार!

***ऑपरेशन गुलमोहर. पृष्ठे २५० एकशे पन्नास रुपये***

## ॥ रसिक वाचकांची आवड ॥

वाचकांसाठी आम्ही एक अभिनव सदर सुरू करीत आहोत. वाचकांनो, आमच्या प्रकाशनाचे आपल्याला आवडलेल्या पुस्तकाबद्दलचे मत, पुस्तक का आवडले? याबद्दल पत्ररूपाने कळवा. या पत्रांनी शक्य होईल त्याप्रमाणे ग्रंथजगतच्या अंकात प्रसिद्धी दिली जाईल. वाचकांनी स्वत:चे नाव, पत्ता, शिक्षण व नोकरीतील हुद्दा इ. माहितीसह आपली मते कळवावीत.

आमचा पत्ता :
**मेहता मराठी ग्रंथजगत,**
१२१६, सदाशिव पेठ, पुणे–३०.

**वि. शं. चौघुले**
सांताक्रुझ (पश्चिम),
मुंबई–५४.

सस्नेह नमस्कार,
तुमचे ‘हृदयविकार निवारण’ हे अनुवादपर पुस्तक मला फार आवडले विशेष म्हणजे केवळ डॉ. डीन ऑर्निश ह्यांच्या मूळ पुस्तकाचा अनुवाद असे पुस्तकाचे स्वरूप नसून डॉ. हिरेमठ यांच्या प्रयत्नांविषयी **S.S.Y**विषयी पण तुम्ही माहिती दिली आहे. भाषांतर सुबोध आणि वाचनीय झाले आहे.
या पुस्तकामुळे हृदयविकाराच्या स्वरुपाची माहिती सर्वसामान्य रूग्णांना होईल. त्यांना दिलासाही मिळेल.

कळावे.

*वि. शं. चौघुले*

### हृदयरुग्णांसाठी उपयुक्त आहार नियोजन व मार्गदर्शन

# हृदयविकार निवारण

**शुभदा गोगटे**

हृदयरुग्णांसाठी बहुमोल मार्गदर्शन करणारे ‘हृदयविकार निवारण’ हे पुस्तक एका नव्या जीवनशैलीचेही उपयुक्त धडे देणारे आहे. डॉ. डीन ऑर्निश आणि डॉ. जगदीश हिरेमठ यांनी केलेल्या प्रयोगांचे निष्कर्षही त्यात नोंदवण्यात आले आहेत.

हार्ट ॲटॅक हा शब्दकानी पडल्यावर भल्याभल्यांच्या छातीत धडधडायला लागते. हृदयाला झटका बसला की आपले काही खरे नाही, काही दिवसांचेच आपण या जगातले वाटसरू यासारख्या विचाराने नातीगोती, धनवैभव, कीर्ती लौकिक सगळे निरर्थक वाटू लागते. हृदयाभोवती पिढ्यानुपिढ्या कविकलावंतांनी केलेल्या रोमँटिक भावबंधाच्या गुलाबी कल्पनांची धुंदी क्षणात ओसरते आणि सर्व सुखांची चवच हरवून जाते. खरे पाहिले तर हृदय हा आपल्या शरीरातला अवयव आहे. आपल्या मुठीएवढा. आणि हृदय हे प्रेमाचे केंद्र असे मानून आय लव्ह यू म्हणून हार्टचे चित्र काढणाऱ्यांना कळायला हवे की हृदय हा एक सतत उघडझाप करणारा, अशुद्ध रक्त घेऊन ते शुद्ध करणारा पंप आहे. हा एक पंप असला तरी आहे महत्त्वाचाच! जन्मापासून मृत्यूपर्यंत तो क्षणभरही न थांबता सारखा चालू असतो; आणि आपले रक्तशुद्धीकरणाचे कार्य अखंड करीत असतो. या पंपाच्या झडपेकडे अशुद्ध रक्त आणण्याचे काम नीला या रक्तवाहिन्या करतात; आणि शुद्ध झालेले रक्त शरीरभर नेण्याचे काम रोहिणी रक्तवाहिन्या करतात. जर काही कारणाने या नीलांचा किंवा रोहिण्यांचा मार्ग अवरुद्ध झाला, या रक्तवाहिन्यात गाठ झाली वा चरबीची गुठळी झाली तर रक्ताभिसरणात अडथळा येतो, हृदयाच्या झडपेचे काम नीट होण्यात अडचणी येतात– तेव्हा ते पूर्ववत सुरळीत करण्यासाठी वैद्यकीय मदत घ्यावी लागते. बायपास शस्त्रक्रियेद्वारे वेगळ्या वाटेने रक्ताचा प्रवाह



अप्रतिहत चालू राहील अशी व्यवस्था करावी लागते... परंतु हृदयावरील शस्त्रक्रिया म्हटले की धोक्याची घंटा मनाला सतावतेच, आणि आर्थिक दृष्ट्याही काही लाखांची तरतूद त्यासाठी आवश्यक ठरते. ती अनेकांच्या आटोक्यात नसतेही!

हृदयविकार टाळण्यासाठी काय करावे आणि हृदय विकार झाल्यावर काय काळजी घ्यावी याबद्दल अनुभवसंपन्न असे मार्गदर्शन कोणी केले तर तेही मोलाचे ठरले. बुडत्याला काडीचा आधार.

डॉ. डीन ऑर्निश यांनी १९९० मध्ये प्रोग्रॅम फॉर रिव्हर्सिंग हार्ट डिसीझ नावाचे पुस्तक प्रसिद्ध केले; आणि हृदयविकाराच्या रुग्णांना आपली जीवनशैली बदलून चांगल्या प्रकारे जगता येऊ शकेल हा आत्मविश्वास त्यांनी जागा केला. डॉ. ऑर्निश यांनी आपल्या या पुस्तकाद्वारे हृदयविकाराकडे पाहण्याची एक वेगळी दृष्टी दिली.

ही वेगळी दृष्टी नेमकी कोणती? या प्रश्नाचे उत्तर म्हटले तर अगदी साधे आहे.

आतापर्यंत हृदयविकारावर वैद्यकीय उपचार करताना डॉक्टर असे समजून चालत की एखाद्याच्या हृदयाचे काम नीट चालत नाही; तर शरीराचा एक अवयव म्हणून हृदयावरच लक्ष केंद्रित करून उपाययोजना करा. उदाहरणार्थ, रक्तवाहिनीत कोलेस्टेरॉलमुळे आतल्या अस्तावर किटण (प्लाक) जमत गेल्याने तिची आतली पोकळी कमी होऊन हृदयाकडे जाणारा रक्तप्रवाह घटून अँजायनाचा त्रास सुरू होतो. तर हृदयाचा रक्तपुरवठा वाढवण्यासाठी त्या रक्तवाहिनीची दिशा बदलून अडथळ्याच्या खालच्या बाजूला जोडायची; किंवा बायपासद्वारे रुग्णाच्या पायातील एक नीला (अशुद्ध रक्तवाहिनी) काढून ती हृदयधमनीतील अडथळ्याला ओलांडून पलीकडे जाईल अशा रीतीने जोडायची, या शस्त्रक्रियांचा वापर करणे. (अशा बायपास शस्त्रक्रिया १९६१ पासून सुरू झाल्या. आता त्या सर्वत्र सहजपणे मोठ्या प्रमाणावर होतात; कधी कधी तर गरज नसतानाही केल्या जातात!)

डॉ. आर्निश यांनी हृदयविकार म्हणजे केवळ शारीरिक दुखणे असे न मानता शरीर आणि मन या दोहोंचा तो संयुक्त आजार आहे असे गृहीतकृत्य प्रथमच ठामपणे मांडले; आणि शरीरावरील उपचाराबरोबर मानसिक ताणतणाव कमी करण्यासाठी योग्य आहार, धूम्रपान निषेध, योग-ध्यान-प्राणायाम आणि कल्पनाचित्र वगैरे बाबींचा समावेश असणाऱ्या जीवनशैलीमुळे हृदयविकार टाळता येईल आणि हृदयविकाराची तीव्रता क्षीण करता येईल, नेहमीसारखे जीवन त्या व्यक्तीला जगता येईल असे प्रयोगाद्वारे पडताळून पाहिले.

डॉ. आर्निश यांनी १९७७ पासून जीवनशैलीतील बदलाद्वारे हृदयविकार निवारणाबाबत प्रयोग सुरू केले. त्यालाही स्वामी सच्चिदानंद यांचे एक प्रवचन निमित्तमात्र ठरले. स्वत:चे वैद्यकीय शिक्षण चालू असताना त्याबद्दल असमाधान वाटून आत्महत्या करण्याचे

विचार डीन आर्निश यांच्या मनात येऊ लागले. मन:स्थिती बिघडली. अशा अवस्थेत स्वामी सच्चिदानंदांचे एक प्रवचन त्यांना ऐकायला मिळाले. त्या प्रवचनाचे मुख्य सूत्र होते ते असे की "चिरंतन सुख कोणत्याच गोष्टीने मिळत नाही. सुख हे बाहेरून कुठून आणता येत नाही. ते आपल्या मनातच असते. सुख, समाधान, शांती या गोष्टी मिळण्यासाठी विशेष काहीच धडपड करायची गरज नसते. त्या गोष्टी तुमच्या मनातच असतात. फक्त त्यासाठी आपलं मन आणि आपलं शरीर शांत ठेवावं लागतं. मन:शांतीसाठी योगासनं, ध्यान, प्राणायाम, शाकाहार या गोष्टींचा उपयोग होतो. बदलत्या जीवनशैलीमुळे मन:स्वास्थ्य आणि निकोप शरीर लाभते; कार्यक्षम व आशावादी मनोभूमिकाही तयार होते." या प्रवचनाचे सूत्र हृदयरुग्णांसाठी वापरले तर ते फायदेशीर ठरेल असे डॉ. आर्निश यांना वाटले; आणि तसे प्रयोग त्यांनी रुग्णांवर सातत्याने करून त्याचे निष्कर्ष पुस्तकरूपात मांडले.

हृदयविकार कमी करण्यात कोलेस्टेरॉल हा घटक महत्त्वपूर्ण ठरतो असे समजून बहुतेक डॉक्टर आहारातील स्निग्धांश-चरबीयुक्त पदार्थ कमी करण्याचे पथ्य पाळायला सांगतात. कोलेस्टेरॉलचे प्रमाण कमी करण्यासाठी औषधेही देतात. परंतु कोलेस्टेरॉलचे प्रमाण कमी करूनही सर्वच हृदयरुग्णांमध्ये अपेक्षित सुधारणा दिसून येत नाहीत हेही त्यांच्या लक्षात आले. कोलेस्टेरॉलची रक्तातील पातळी आणि हृदयधमन्यातील अडथळ्यात होणारा बदल यांचा थेट संबंध प्रयोगाद्वारेही निर्विवादपणे सिद्ध होत नव्हता.

डॉ. आर्निश यांना आपल्या प्रयोगाद्वारे असे आढळले की, मानसिक ताण कमी झाला आणि आहार-ध्यान-धारणा वगैरे बाबतीत नियमितपणा पाळला तर हृदयविकाराला बराचसा आवर घालता येतो; आणि हृदयरुग्णालाही आत्मविश्वासाने आपली दैनंदिन कामे निर्वेधपणे पार पाडणे शक्य होते.

पुणे येथील डॉ. जगदीश हिरेमठ यांनी पूना हॉस्पिटलमध्ये या धर्तीवर हृदयविकारनिवारण कार्यक्रम १९९५ पासून सुरू केला. प्रथम बॅचसाठी २० हृदयरुग्णांना त्यासाठी निवडले. त्या रुग्णांनी विशिष्ट पथ्ये व जीवनशैली काटेकोरपणे पाळावा अशी अपेक्षा बाळगली.

(१) तेल, तूप व इतर स्निग्ध संपृक्त चरबी बहुतांशी वर्ज्य असणारा शाकाहार घ्यावा.
(२) योग्य तेवढा व योग्य तो व्यायाम करावा.
(३) मानसिक ताणतणाव व्यवस्थितपणे हाताळावे.
(४) सिगरेट, तंबाखू, मद्यपान वगैरे व्यसनांपासून दूर रहावे.

डॉ. आर्निश यांच्या या चतु:सूत्रीला डॉ. हिरेमठ यांनी सिद्ध समाधी योग, ध्यान, प्राणायाम आणि योगासने यांची जोड दिली. दर आठवड्याला व्याख्यानाच्या निमित्ताने



या प्रयोगात भाग घेणाऱ्या रुग्णांनी भेटून परस्पर अनुभवांची देवाणघेवाण करून त्यावर चर्चा करण्यालाही उत्तेजन दिले.

१५ महिन्यांनी या रुग्णांची तपासणी केल्यावर आरोग्यदृष्ट्या तर फरक दिसलाच, या सर्वांच्या जीवनात उत्साह व आशावादही दिसला. काम करण्याची उमेद वाढली. शांत व समाधानी मनोधारणेमुळे सुखदु:खप्रसंगी मनाची समधातता अधिक दिसू लागली.

या रुग्णांनी आहारात दूध, तेल, तूप वगळावे व जास्तीत जास्त १० टक्के स्निग्धांश आहारात ठेवावा, साठ टक्के तरी कच्चा शाकाहार घ्यावा, असे सांगण्यात आले. कच्च्या भाज्या, भिजवलेल्या डाळी, मोडाची कडधान्ये, वेगवेगळी फळे, यावर भर द्यावा. चहा, कॉफी यांचाही शक्यतो त्याग करावा. ताक, दही, थोड्या प्रमाणात घ्यावे. इत्यादी मार्गदर्शक सूत्रे आहाराबाबत देण्यात आली.

या पहिल्या गटातील २० रुग्णांपैकी एकालाही हृदयविकाराचा झटका १५ महिन्यांच्या काळात आला नाही, कोणावरही शस्त्रक्रिया करावी लागली नाही. कोणालाही हॉस्पिटलमध्ये राहावे लागले नाही. बहुतेकांचे वजन घटले, औषधांचे प्रमाणही कमी करणे शक्य झाले, एकमेकांशी सख्य वाढले आणि एकूणच सर्वांचा उत्साह वाढत राहिला. शारीरिक तक्रारी कमी कमी होत गेल्या. काहींचा रक्तदाब कमी झाला, धमन्यातील मोठे अडथळे बऱ्याच अंशी कमी झाले.

- स्नायूंचे शिथिलीकरण कसे करावे? श्वसनाचे व्यायाम कुठले?
- व्यायाम कोणता व किती वेळ करावा?
- विशिष्ट व्याधी असताना व्यायाम करताना कोणती काळजी घ्यावी?
- आहार घेताना काय पथ्ये पाळावीत?
- विविध आसने करताना कोणती दक्षता घ्यावी?
- थॅलिमम स्ट्रेस टेस्ट कशी घेतात?

वगैरे प्रश्नांचीही उत्तरे पुस्तकात देण्यात आली आहेत.

डॉ. हिरेमठ यांच्या कार्यक्रमात सहभागी झालेल्या प्रभाकर बंडगर, रमेश बापट यांचे अनुभव नोंदवण्यात आले आहेत.

हृदयाला उपकारक अशा १०२ पाककृतीही शेवटी दिल्या आहेत. भात, भाज्या, कोशिंबिरी, चटण्या, सूप व सार, गोड पदार्थ, उपाहाराचे पदार्थ यात वैविध्य निर्माण करता येते. त्यामुळे आहारातला तोचतोचपणा टाळता येतो. पौष्टिक सात्त्विक आहारामुळे कोलेस्टेरॉलचे प्रमाण आटोक्यात राखता येते.

हृदयरोग झालेला असो वा नसो, हे पुस्तक आपण जरूर वाचावे. हृदयविकार टाळता येणे किंवा आटोक्यात ठेवणे त्यामुळे शक्य होईल. एकूणच आपल्या जीवनात

काही पथ्ये पाळली तर निरोगी, निरामय, आनंदी व तृप्त जीवन जगणे आपल्याला अवघड नाही, ते बऱ्याच प्रमाणात आपल्याच हातात आहे असा साक्षात्कार या पुस्तकामुळे होईल. आनंदी व सुखी, निरोगी व निकोप आयुष्य हा आपला हक्क आहे. चुकीच्या जीवनशैलीमुळे आपण या हक्कापासून स्वत:लाच वंचित ठेवतो. स्वत:चेच नुकसान करतो. अशी जाणीव या पुस्तकामुळे सहजपणे होईल. सौ. शुभदा गोगटे यांनी हे पुस्तक लिहून एक बहुमोल कामगिरी बजावली आहे.

*हृदयविकार निवारण : पृष्ठे २५०. दीडशे रुपये*

## फेब्रुवारी ९९ स्पर्धा निकाल

**नावे कळवा, बक्षीस मिळवा!**

१) *हे वैगुण्य कुठले हे मात्र त्यांनाही कळत नव्हते*
वि. स. खांडेकरांची कविता पृष्ठ २७

२) *जागतिक अर्थकारणात भारताचे खच्चीकरण व्हावे अशीच... धोरणे असत*
बिझिनेस महाराजे पृष्ठ २०

३) *मी वीस वर्षापूर्वीच सिगरेट सोडायला हवी होती.*
झुंज कॅन्सरशी! पृष्ठ ३२

४) *तुझ्या सान्निध्यात मी अगदी तरुण असल्यासारखे वाटते*
द केन स्टार रिपोर्ट पृष्ठ ३६

५) *तुझी जन्मभर उगाचच सेवा केली. ह्या भंडाऱ्याची माती झाली.*
चौंडकं पृष्ठ ४२

**विजेते स्पर्धक :**

१) **उज्ज्वला वैद्य,** गजानन कॉलनी दर्यापूर, मु.पो.ता. दर्यापूर, जि. अमरावती-३.

२) **सौ. उषा गोडबोले,** ७, आर्चिस सोसायटी, महेत रोड, विलेपार्ले पूर्व, मुंबई-५७.

३) **आसावरी प्र. पाटील,** १५०/१, एन.ए.डी. कॉलनी, करंजा पोष्ट, उरण, नवी मुंबई-४.

***सर्व विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन!***
त्यांनी आपल्या पसंतीची रु.१००ची पुस्तके कळवावीत.

आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथजगत,** १२१६, सदाशिव पेठ, पुणे-३०.



**मुस्लीम उलेमांच्या फतव्यांचे भयानक मायाजाल**

# द वर्ल्ड ऑफ फतवा

**मूळ लेखक : अरूण शौरी**
**अनुवाद : भारती पांडे**

भारतातील एक अग्रगण्य व वादग्रस्त पत्रकार म्हणून अरुण शौरी यांची ख्याती आहे. वेगवेगळ्या विषयांचा मूलगामी अभ्यास करून सत्यस्थिती वाचकांपुढे ठेवण्याचे त्यांचे व्रत मुक्त पत्रकार म्हणूनही ते अविरत निष्ठेने चालवत आहेत. डॉ. आंबेडकर यांच्याबद्दल 'वरशिपिंग फाल्स गॉड्स्' हे पुस्तक लिहून ब्रिटिशधार्जिण्या आणि स्वातंत्र्यविरोधी अशा ज्या कृती घडल्या त्याकडे लक्ष वेधण्याचा शौरींचा प्रयत्न खूपच खळबळ उडवणारा ठरला. 'दि वर्ल्ड ऑफ फतवा' या पुस्तकात मुस्लिम समाजावर धर्मगुरू उलेमा फतव्यांद्वारे जे मानसिक दडपण आणतात आणि वैचारिक दृष्टीने त्या समाजाला एका चिरेबंदी व्यवस्थेत ठासून ठोकून बसवतात, त्यावर अरुण शौरी यांनी प्रकाश टाकला आहे.

फतवा म्हणजे आदेश. आज्ञा. हुकूम. विशिष्ट कृती करण्याबद्दल धर्माच्या नावाने काढलेले फर्मान. या फतव्यातील आदेशांचे पालन करणे हे प्रत्येक मुस्लिम व्यक्तीला आपले धर्मकर्तव्य वाटते. तशी त्याची मानसिकता घडवण्यात आली आहे. स्वतंत्र बुद्धीने विचारपूर्वक व स्वत:ला पटेल अशी कृती करणे हा हक्क मुस्लिम समाजातील व्यक्तीला नाही; आणि तसा तो असावा अशी कोणी मागणीही करीत नाही. मुस्लिम समाजात हे प्रबोधनाचे, बुद्धिप्रामाण्याचे, व्यक्तिस्वातंत्र्याचे, उच्चार स्वातंत्र्याचे युग अजून आलेले नाही. सातशे वर्षापूर्वी कुराण वा शरीयतमध्ये जे काही लिहिलेले आहे त्यापलीकडे जगात काही घडले आहे, घडत आहे ते स्वीकारण्याची तयारीच या समाजाची नाही. काळाप्रमाणे माणसाच्या आचारविचारात, आदर्शात फरक पडतो हेही सनातनी कर्मठ मुस्लिम मूलतत्त्ववाद्यांना मंजूर नाही. त्यामुळे मुस्लिम राष्ट्रांमध्ये एक

प्रकारचा बंदिस्तपणा, आग्रहीपणा आणि आक्रमकपणाही जाणवतो. उलेमांची समाजावरची पकड आजही कायम आहे. अल्लाचा ग्रंथ, प्रेषिताचा सुन्ना आणि कायद्याचे ग्रंथ यांच्या मदतीने सोडविता येणार नाही असा एकही प्रश्न नाही अशी मुस्लिम दर अल-उलुम या संस्थेची धारणा आहे. इस्लामी कायद्याचे निवाडे गृहात धरायचे व पाळायचे असतात; त्यावर साधकबाधक चर्चा करायची नसते हेही मुस्लिम मानसिकतेने निमूटपणे स्वीकारलेले एक सूत्र आहे.

अरुण शौरी यांनी फतवा-इ-रिझविया (१२ खंड), किफात-उल-मुफ्ती (९ खंड) फतवा-इ-उलेमा दर अल-उल्लुम देवबंद (१२ खंड), फतवा-इ-अहल-इ-ह दिस (४ खंड) फतवा-इ-रहिमिया (३ खंड) हे विचार-विश्लेषणासाठी घेतले आहेत.

हे फतवे जारी करणाऱ्या उलेमांमध्ये किंवा संस्थांमध्येही मतभेद होते हे अरुण शौरी स्पष्ट करतात. मूळ कुराणात व हदिसमध्ये आहे तेच आम्ही सांगतो असा दावा करीत असतानाच अनेक गुंतेही निर्माण केले जातात. अहल-इ-हदिस या 'सुधारक' चळवळीने विचारात घेतलेले काही विषय पाहिले की आश्चर्य वाटेल.

- नमाज पढताना एका गुडघ्यावर टेकावे की दोन्ही गुडघ्यांवर टेकावे?
- ऐकू येईल असं आमीन म्हणावं की अगदी हळू म्हणावं?
- पिरांचे उरुस साजरे करावेत की नाही? त्यापासून काही फायदा होतो की नाही?
- मेलेल्या माणसांसाठी नमाज पढणे कितपत इष्ट आहे?
- काफिरांनी शिजवलेले अन्न खावे का? हिंदूने स्नान केलेल्या जागेचे पाणी घ्यावे की नाही?
- इतर मुस्लिम ज्या मशिदीत नमाज पढतात तिथे मुहमदी वा वहाबी मुस्लिमांनी नमाज पढावा का?
- मिशांचे केस किती दिवसांनी कापावे? नखे कधी काढावी? दाढीची लांबी किती असावी?

प्रास्ताविकामध्ये अरुण शौरी यांनी या लेखनामागचे प्रयोजन स्पष्ट केले आहे. या फतव्यांचे संग्रह निघत असले तरी त्यांचा चिकित्सक अभ्यास मुस्लिम विद्वान करायला तयार नाहीत. अरुण शौरी यांनी त्यांचा अभ्यास करण्यासाठी काही वर्षे व्यतीत केली. त्यांचं वर्चस्व, श्रद्धावान (भाविक) आणि अश्रद्ध (काफिर), स्त्रिया आणि शरिया, शरिया आणि सत्ता, त्यांचं जग, कुराण आणि हदिस, आपलं जग असे मुख्य विभाग पाडून अरुण शौरी यांनी भरपूर अवतरणे व संदर्भ देत फतव्यांचा आशय नेमका पकडण्याची शिकस्त केली आहे.

"श्री. गांधींचे चारित्र्य कितीही स्वच्छ असले तरी धर्माच्या दृष्टीने पाहिले तर



एखाद्या चरित्रहीन मुसलमानापेक्षा त्याची किंमत मला कमीच दिसते." "माझ्या धर्मानुसार आणि तत्त्वांनुसार मी एखादा व्यभिचारी व पापी मुसलमानही श्री. गांधींपेक्षा उच्च दर्जाचा समजतो" हे मौलाना मोहमद अली यांचे उद्‌गार एकेकाळी भारतात खळबळ माजवणारे ठरले. महात्मा गांधी यांनी या उदगारांचा राग न मानता, "मौलांनाचे तर्कशास्त्र अचूक आहे" असे मत व्यक्त करताना स्पष्टीकरणादाखल म्हटले, "पाच फूट उंचीच्या माणसाला दुसरा सात फूट उंचीचा माणूस आपल्याहून कमी उंचीचा समजतो यात चूक काय आहे? मग भले तो पाच फुटी माणूस इतर सर्व बाबतीत त्या सात फुटी माणसाहून उच्च दर्जाचा असो! जोपर्यंत मौलाना स्वत:चा धर्म सर्वोत्कृष्ट धर्म आहे असे समजत आहेत तोवर ते स्वत:ला इतर तथाकथित उच्च कोटीतल्या व्यक्तीहून श्रेष्ठ समजतात यात नवल काय?"

हे उदाहरण देऊन अरुण शौरी मुस्लिम मानसिकतेतला बंदिस्तपणा कसा पक्का असतो याबद्दल स्वत:ची व वाचकांची खातरजमा करून घेतात. अर्थात मुस्लिम समाजातही काही नवे व स्वतंत्र विचार मांडण्याचे प्रयत्न झाले; परंतु त्यांना फारसे बळ लाभले नाही, या वस्तुस्थितीचीही तपशीलवार नोंद शौरी करतात.

उलेमा हे कायदे करणारे व त्याची अंमलबजावणी करणारे होते. तसेच धार्मिक कृत्ये, संस्कार आणि कर्मकांडही पार पाडणारे होते. तेच लग्ने लावीत. तेच घटस्फोट देत. तेच फतवे काढीत. तेच त्या फतव्यांचा अर्थ लावत. सामान्य माणसाच्या दैनंदिन आयुष्यातील घटनांबद्दल निर्णायक मत देण्याचा अधिकार उलेमांच्याच हातात आजही आहे. ज्या देशात इस्लाम हा राजधर्म आहे तेथे उलेमा सर्वशक्तिमान बनले; ते देशही मध्ययुगीनच राहिले! उलेमांच्या विरुद्ध बोलणारा मुसलमान आजही सापडत नाही इतकी त्यांची दहशत आहे. त्यांचेच नियंत्रण संपर्कजाल, संपर्कयंत्रणा, मशिदी, मकतबे व मदरसे यांवर आहे. सर्व धर्मशिक्षण संस्था त्यांच्या नियंत्रणाखाली आहेत. संपूर्ण समाज पेटवून टाकण्याची ताकद त्यांच्यात आहे. उर्दू वृत्तपत्रेही उलेमांच्याच बडिवारापुढे नतमस्तक होतात. इस्लामवर हल्ला होतो आहे किंवा इस्लाम खतरे में है म्हटले की सर्वजण उलेमांच्या पुढे नांगी टाकतात. इस्लामबाबत कधीही मूलगामी चर्चा करण्याला मूलतत्त्ववाद्यांनी मान्यता दिलेली नाही. लगेच धर्मभ्रष्ट म्हणून अशा स्वतंत्र विचाराच्या व्यक्तीची संभावना व निर्भर्त्सना केली जाते. "इस्लामच्या पायाभूत धर्मसंकल्पना एकतर्फी आहेत आणि प्रेषिताच्या आगमनावर विश्वास ठेवणाऱ्या आहेत. या धर्मकल्पना आयुष्याच्या प्रत्येक पैलूवर, प्रत्येक क्षेत्रावर नियंत्रण ठेवू पाहतात," हे अरुण शौरी स्पष्ट करतात.

मुस्लीम मुफ्ती किती बारीकसारीक गोष्टींवर बंधने घालतात हे 'संपूर्ण जीवन' या दुसऱ्या प्रकरणात दिले आहे.

उलेमा हे कसे दुष्ट व धोकेबाज आहेत याबद्दल मुस्लिम लेखकांनीच व्यक्त केलेली मते शेवटच्या प्रकरणात दिली आहेत. उलेमांमधील भ्रष्टाचार, अनाचार, व्यभिचार, यांचेही असंख्य किस्से आहेत. त्यामुळे उलेमांचे समाजातील स्थान आणि फतव्यांद्वारे त्यांनी समाजावर प्रस्थापित केलेले नियंत्रण यांचे भयानक स्वरूप या पुस्तकामुळे वाचकांना ज्ञात होईल.

***द वर्ल्ड ऑफ फतवा, पृष्ठे ४१०, तीनशे रुपये***

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| शी | का | आ | ले | फु | त | सा |
| णे | | बी | | ति | या | य |
| दे | झों | स | ल्या | ट | मा | क्र |
| चे | पै | च | म्रा | यु | ळ | च |
| त्रां | उ | स | स्वा | गा | ज | थ |
| क्ष | ट | ला | मी | न्त | का | र |
| न | | म | शी | रे | र्भ | ग |

## पुस्तकांची नावे सांगा. बक्षीस मिळवा!

शेजारील चौकोनात **१३** पुस्तकांची नावे आहेत. या सर्वच पुस्तकांना साहित्यसृष्टीतील मानाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

**पुरस्काराचे नाव व पुस्तकांची नावे ओळखा.**

रचनाकार : मनोहर बांदेकर

## जोड्या जुळवा, बक्षीस मिळवा!

खाली काही अनुवादित पुस्तकांची नावे व मूळ लेखकांची नावे दिली आहेत. त्याच्या योग्य जोड्या जुळवा.

**परिशोध, एडविना आणि नेहरू, चीपर बाय द डझन, साक्षी, फेरा, मायामृग, नो कम बॅक्स, वुई दि पीपल**

**के. पी. पूर्णचंद्रतेजस्वी, सरला बार्बनस, एस. एल. भैरप्पा, तसलिमा नसरिन, कॅथरिन क्लेमंट, फ्रॅंक बंकर गिलब्रेथ**

वरील दोन्ही स्पर्धांची बरोबर उत्तरे पाठवणाऱ्यांपैकी (लॉट टाकून येणाऱ्या) पहिल्या तीन स्पर्धकांना प्रत्येकी १००रु. ची पुस्तके बक्षीस मिळतील. **उत्तरे पाठवण्याची अंतिम तारीख २० मे, ९९.**

आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथजगत**, १२१६, सदाशिव पेठ, पुणे-३०.



**कर्तव्यदक्ष जागरूक नागरिकच भारतात सुवर्णयुग सुरु करेल**

# नागरिक

**अविनाश धर्माधिकारी**

अविनाश धर्माधिकारी यांनी आयएएस परीक्षेत उत्तम यश मिळवून दहा वर्षे शासकीय कामकाजाचा अनुभव घेतला. ज्ञानप्रबोधिनीचे ते विद्यार्थी; विशिष्ट सामाजिक नैतिक मूल्यांचा संस्कार घेऊन प्रशासकीय सेवेत उतरल्यावर त्याच मूल्यांची जपणूक करण्याचा जाणीवपूर्वक आदर्श त्यांनी समोर ठेवला; आणि सामान्य जनतेचे प्रश्न सहजपणे सुटावेत, हेलपाटे न घालता कामे व्हावेत अशी घडी बसवण्याचा आणि त्यासाठी सरकारी कर्मचाऱ्यांच्या मानसिकतेतच बदल घडवून आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न त्यांनी केला. 'अस्वस्थ दशकाची डायरी' या पुस्तकात आयएएसमध्ये प्रवेश करण्यापूर्वी भारतभर संचार करून देशापुढील विविध समस्यांची संबंधितांना प्रत्यक्ष भेटून त्यांनी माहिती मिळविली. त्यामुळे केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर सबंध देशाच्या परिप्रेक्ष्यात त्यांना आपल्या भूमिकेचे तपासणी करणे शक्य झाले आणि ते व्यापक भान घेऊन धर्माधिकारी प्रशासकीय सत्तेचा एक घटक बनले. या प्रशासकीय यंत्रणेचे सामर्थ्य आणि मर्यादा याचा अनुभव घेतल्यावर स्वत:ला त्या चौकटीत बंदिस्त करून घेण्याची निरर्थकता त्यांना पटली; आणि अधिक प्रभावी कृतीसाठी त्यांनी लोकसभेची निवडणूक लढवून संसदेत जाण्याची व एकूणच सरकारच्या ध्येयधोरणाला दिशा देण्याची निकड प्रमाण मानली.

आपल्या प्रशासकीय सेवेचा राजीनामा देऊन त्यांनी निवडणूक लढविली. त्या निवडणुकीत त्यांना राजकीय पक्षांचा आणि राजकीय पुढाऱ्यांचा जो काही विचित्र व दुटप्पी आविष्कार पहायला मिळाला त्यामुळे त्यांच्या आदर्शवादाला वास्तवाचा स्पर्श झाला असावा. नाउमेद न होता चाणक्यमंडळ काढून तरुण वर्गाला स्पर्धा परीक्षांचे तंत्र

समजावून सांगण्यासाठी त्यांनी एक व्यापक व्यासपीठ उभे केले. अण्णासाहेब हजारे यांच्या भ्रष्टाचार विरोधी मोहिमेमध्ये सामील होऊन लोकजागृती अभियानात स्वत:ला झोकून दिले. 'तुम्ही आम्ही आपण सगळेच' या पाक्षिकाद्वारे व्यापक जनसंपर्काचे साधन हाताशी घेतले.

याच काळात दैनिक लोकसत्तामध्ये नागरिक हे सदर चालवून नव्या जागरूक नागरिकत्वाची दिशा स्पष्ट करणारी सूत्रे त्यांनी लोकांपुढे ठेवली.

'नागरिक' हे पुस्तक म्हणजे लोकसत्तेत दीड वर्षाच्या कालावधीत लिहिलेल्या ८२ लेखांचे संकलन. एका परीने हा नव्या जागरूक स्वातंत्र्यप्रिय नागरिकाचा जाहीरनामाच आहे आणि दुसऱ्या बाजूने निकोप व कार्यक्षम लोकशाहीच्या प्रभावी अंमलबजावणीचा कार्यक्रमही आहे. लेखांचे स्वरूप प्रासंगिक असले तरी त्यामागे विचारांची पक्की बैठक व दिशा आहे; आणि काळजीपूर्वक वाचन केले तर सध्याच्या प्रशासन यंत्रणेतील दोष दूर करण्यासाठी कृतिशील डावपेचांचाही एक आराखडा वाचकाला गवसू शकेल.

लोकशाहीमध्ये प्रशासन हे लोकाभिमुख हवे आणि ते लोकाभिमुख व पारदर्शक असण्यासाठी नागरिकांचे समांतर सरकार असण्याची गरज आहे; त्यासाठी नागरिकांचा जाहीरनामा हवा, मुर्दाड व भ्रष्ट सरकारी यंत्रणेशी लढा देण्याचे सत्याग्रही तंत्र व कार्यपद्धती हवी, माहितीचा हक्क हवा, लोकप्रतिनिधींना परत बोलावण्याचा हक्क हवा, भ्रष्टाचारविरुद्ध आंदोलन करण्याची इच्छाशक्ती हवी, संघटित कृती हवी, सार्वजनिक जीवनाची आचारसंहिता हवी; प्रसंगी माणसांनी पेटून उठायला हवं, गुलामीच्या आणि गुर्मीच्या गतिशास्त्राला आव्हान द्यायला हवे, दहशतीचा सामना करायला हवा, न्यायव्यवस्थेतही निर्भयपणे काम करणे शक्य व्हावे असे वातावरण हवे. अशी सर्वसाधारण दिशा अविनाश धर्माधिकारी यांनी या सर्व लेखांमधून सूचित केली आहे. सार्वजनिक उत्तरदायित्वाचं तत्त्व, खुल्या पारदर्शक शासनाचं तत्त्व आणि कार्यपद्धतीचं सुलभीकरण आणि प्रामाणिकपणाचं तत्त्व या तिघांच्या आधारावर प्रशासनाची पुनर्रचना व्हावी असे ते म्हणतात. ९२२९)

धर्माधिकारी यांच्या मनात तुफान वादळ आहे आणि जनहिताची अलोट कळकळ आहे; त्यामुळे त्यांच्या प्रतिपादनात आक्रमक आवेश आणि आग्रही ठामपणा आहे. समर्पक दृष्टान्त, उदाहरणे, किस्से देऊन आपली भूमिका ते मांडतात. जळजळीत उपरोध-उपहासही प्रसंगी वापरतात. परंतु त्यामागे कडवटपणा वा कटुता नाही; लोक स्वत:च्या हक्कांबद्दल इतके उदासीन का याबद्दलचा सात्त्विक संताप आहे. अन्यायाचा प्रतिसाद करण्याबाबत आपली वृत्तीच बोथट होत आहे याबद्दलची चीड आहे. ही सार्वत्रिक अनास्था त्यांना अस्वस्थ करते.

"समोरची कचरापेटी चार दिवस साचत गेली आहे. नागरिक तक्रार करील?



रॉकेल, गॅस, टेलिफोन, सार्वजनिक वाहतूक, रेल्वे, शाळांमध्ये प्रवेश, रेशनकार्ड, हजारो दाखले, परवाने, अर्ज, प्रत्येक पावलावर हेळसांड, अपमान, विलंब आणि गैरप्रकार घडले तर आपला नागरिक खवळून उठतो का? नाही. तो सर्वसाधारणपणे सोसतो, सहन करतो. झाला गेला प्रसंग साजरा करून आपलं आयुष्य जगण्याच्या मार्गाला लागतो. आणि याचा दोष तरी कोणाला द्यावा? साधं जगत राहणं, पावलापावलावर ठेचकाळणं, खडकावर डोकं आपटत राहणं नावाच्या लढाईतच आपल्या सर्वांच्या तोंडाला रोजच्या रोज इतका फेस येत असतो की तो फेस पुसून छातीतला श्वास फुलवून एक गर्जना करण्याएवढी शक्ती किंवा फुरसत कोणापाशी नसते."(९)

या लेखांबरोबर काही वाक्ये व वचने ठळकपणे प्रत्येक विषमपृष्ठावर छापलेली आहेत. ती वाक्येही विचारप्रवर्तक व दिशादर्शक आहेत. नमुन्यादाखल काही वाक्ये येथे देतो.

- माणसाचा माणसाच्या चांगुलपणावरचा विश्वास पुन्हा निर्माण होईल असं काहीतरी करायला हवं. निदान आपला नागरिक म्हणून स्वत:वरचा विश्वास टिकेल व वाढेल असं काहीतरी करायला हवं.
- सार्वजनिक संस्थांची लयाला गेलेली विश्वासार्हता पुन्हा निर्माण होईल असं पुनर्रचनेचं, नवनिर्माणाचं काम व्हायला हवं.
- एकेकटा माणूस संघर्षाला, प्रतिकाराला उभा राहील ही अपेक्षा नाही करता येत. तो एकेकटा मोडून पडेल. पराभूत होईल. एकाच वेळी शेकडो, हजारो, लाखो जणांनी एकत्र येऊन समान कृती केली तर संघटित सामर्थ्य निर्माण होईल.
- नागरिक कृती योजना हा स्वसामर्थ्यवृद्धी किंवा सबलीकरण किंवा आत्मनिर्भरता यांचा पाया आहे.
- स्वातंत्र्यपूर्व काळात सविनय कायदेभंगाच्या चळवळीसाठी सत्याग्रहाची गरज होती. आता गरज आहे ती सविनय कायदेपालनाच्या सत्याग्रहाची!
- आज सर्व चांगल्या माणसांनी यंत्रणेच्या आतून आणि बाहेरून एकाच वेळी हातात हात घालून परस्परपूरक काम करायला हवं. असं काम म्हणजे नेटवर्क.
- योग्य आणि व्यापक हिताचं तेच करण्याची 'व्यवस्थे'ची क्षमता आज हरवलेली आहे.
- स्वतंत्र, संघटित नागरिक समित्या जागोजाग उभ्या राहिल्या तर लोकशाहीचा एक सशक्त स्तंभ सर्वार्थानं उभा राहील.
- सरकारवर अवलंबून राहणं सोडून नागरिकांनीच एकत्र येणं, कायदेशीर

सनदशीर हत्यारं वापरून शांत, निर्वैर वृत्तीनं सविनय कायदेपालनाची चळवळ उभी करणं गरजेचं आहे.

- जागरूक नागरिकांचा संघटित आवाज उमटला तर कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांचा सहजासहजी बळी जाईल का?
- सरकारची पकड कमी करणं म्हणजे एक नवी संस्कृती निर्माण करणं.
- कालबाह्य कायदे रद्द करून कार्यपद्धती सुधारायला हवी.
- विकेंद्रित व स्वनियंत्रित व्यवस्था नागरिकांनीच निर्माण करायला हवी.
- स्वत:पासून सुरुवात हेच परिवर्तनाचं व विकासाचं पहिलं पाऊल.
- स्वत:चं कर्तव्य आनंदानं करणे–एवढं व्रत पाळलं तरी अनेक गुंते सुटतील.
- व्यक्ती आणि व्यवस्था या दोन्हींचा एकमेकांवर परिणाम होतो. कुठून तरी त्यांच्यातील बदल सुरू व्हायला हवा.
- मराठीपणा, भारतीयपणा वाढवायचा असेल तर विश्वात्मक होणं हाच खरा मार्ग आहे.
- ज्याला निर्भयपणे आवाज उठवायचा आहे त्याचं स्वत:चं नाणं प्रथम खणखणीत हवं.
- स्वत:पासून सुरुवात करणारे लोक एकत्र आले तर त्यातून 'सात्त्विक दहशत' संघटित होईल.
- सरकार कोणत्याही रंगाचं किंवा पक्षाचं असो, भ्रष्टाचाराविरुद्ध लढण्याची ताकद त्याच्यात नसते. त्यासाठी असमान्य ताकदीचा आणि चारित्र्याचं राजकीय नेतृत्व हवं.
- भ्रष्टाचार आपण स्वीकरतो एवढंच नाही तर भ्रष्टाचाराला आपण सन्मानही देतो ही खरी चिंतेची बाब आहे.
- एकाच वेळी दोन टोकांपासून सुरुवात करावी लागेल. स्वत:पासून आणि व्यवस्थेपासून.
- चारित्र्यनिर्माण आणि व्यवस्थापरिवर्तन या दोन्ही गोष्टी एकमेकांवाचून अपूर्ण आहेत.
- अनैतिक समाजात नैतिक माणूस असू शकत नाही हे खरे असेल तर आपण एकाच वेळी स्वत:पासून व समाजापासून सुरुवात करायला हवी.
- भ्रष्टाचाराला मिळालेली लोकमान्यता आणि त्याचं झालेला संस्थाकरण हे जास्त विदारक आहे.
- भ्रष्टाचार मोडून काढण्याचा उपाय म्हणजे सदा सावध राहणे, नियम–पद्धती मुळातून बदलणे, चारित्र्यवान व कर्तृत्ववान व्यक्तींनी अधिकारपदी बसणे.



- भ्रष्टाचार निर्मूलतासाठी आता कुणी अवतार घेईल अशी प्रतीक्षा करणं सोडून, स्वत:वरच आपण विश्वास ठेवायला हवा.
- चारित्र्यवान व इनामदार व्यक्ती आजही अनेक पक्षांत आहेत; पण त्या निष्प्रभ आहेत. त्यांचा आवाज पुन्हा बुलंद होईल असं काहीतरी करायला हवं.
- सार्वजनिक सेवकाच्या उत्पन्नाची साधनं आणि त्याची संपत्ती यावर लक्ष ठेवलं तरी त्याच्या भ्रष्टाचारावर प्रकाश पडू शकेल.
- राजकारणाचं झालेलं गुन्हेगारीकरण निपटून काढण्यासाठी समांतर अर्थव्यवस्था बंद होणे आणि निवडणूक प्रक्रिया सुधारणे हे दोन मार्ग आहेत.
- भोवती जे काही भलंबुरं घडतंय त्याला आपल्यापैकी प्रत्येकजण प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे जबाबदार आहे हे लक्षात घेणं हेच परिवर्तनाचं पहिलं पाऊल.
- सत्तासंघर्षाला ध्येयवादाचा नैतिक आशय प्राप्त व्हायला पाहिजे.
- राजकारण हे बदमाशांचे अंतिम अधिष्ठान बनले आहे. हे त्याऐवजी ते संघटित जागरूक सज्जनांचे प्रथम पाऊल ठरले पाहिजे.
- केवळ वैयक्तिक पातळीवरच मी स्वच्छ आणि चारित्र्यसंपन्न असून भागणार नाही, मी कार्यक्षम, प्रभावी आणि आक्रमकही असायला हवे. व्यावसायिक पातळीवरही माझे उत्तरदायित्व मी स्वीकृत काम उत्तम प्रकारे करून सिद्ध केले पाहिजे.
- सज्जन सात्त्विक असण्याच्या नावाखाली नेभळट दुबळेपणाचे समर्थन होता कामा नये.
- नागरिकांनी स्वत:चा एक जाहीरनामा मांडून सत्याग्रह करायला हवा. सत्याग्रह म्हणजे आपल्या शुद्ध मनाला पटलेल्या व भावलेल्या सत्याचा आग्रह.
- सरकारी कामकाजातील अनावश्यक गोपनीयता ही जनतेची व देशाची शत्रूप्रमाणे गळचेपी करीत आहे. लोकांना माहितीचा हक्क हवा.
- माहितीचा हक्क याचा अर्थ अधिक उत्तरदायी प्रशासन आणि अधिक समर्थ नागरिक.
- हक्काची आणि कर्तृत्वाची जाणीव ठेवून नागरिक आपलं समांतर सरकार स्थापन करतील त्या दिवशी भारताचं नवं सुवर्णयुग सुरू होईल.

***नागरिक, पृष्ठे २५३, दीडशे रुपये***

**ग्रामीण साहित्य चळवळी अर्थपूर्ण होण्यासाठी मूल्यात्मकतेचे भान आवश्यक**

# मराठी ग्रामीण साहित्य : परिसर आणि प्रवाह

**डॉ. गो. म. कुलकर्णी**

ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या, ग्रामीण साहित्याच्या वाटचालीच्या दिशा, व ग्रामीण साहित्य आणि वास्तवता; प्रादेशिकता, ग्रामीण आणि नागर अभिरुची, वेगळ्या चुलीवरचं ग्रामीण साहित्य वगैरे लेख मराठीतील नामवंत ज्येष्ठ समीक्षक डॉ. गो. म. कुलकर्णी यांनी वेळोवेळी लिहिले होते. ते संकलित स्वरूपात 'मराठी ग्रामीण साहित्य : परिसर आणि प्रवाह' या पुस्तकाच्याद्वारे उपलब्ध करून देण्याचे महत्त्वाचे कार्य मेहता पब्लिशिंग हाऊसने बजावले आहे. 'आजच्या साहित्य चळवळी : काही प्रश्न काही उत्तरे' याबद्दलची आनंद यादव आणि डॉ. कुलकर्णी यांच्यातील चर्चा आणि 'समारोप' म्हणून शेवटी जोडलेला मजकूर यामुळे ग्रामीण साहित्याचे एका परीने मूल्यमापनही केले गेले आहे; एक चळवळ म्हणून साहित्याकडे पाहताना, साहित्यावर पडणाऱ्या मर्यादांकडेही लक्ष वेधले आहे. चळवळीतून पुढे आलेला लेखक बव्हंशी त्या चळवळीचा व्यावहारिक फायदा घेण्याच्या नादात साहित्य आणि चळवळ या दोहोंनाही इजा पोचवतो. हा धोका टाळण्यासाठी अखंड सावधानतेचा मंत्र चळवळ संबद्ध अशा सर्व घटकांनी जपण्याची गरज आहे असा निःसंदिग्ध इशारा डॉ. गो. म. कुलकर्णी देतात.

त्याचबरोबर आणखी एका महत्त्वाच्या मुद्द्याकडेही ते लक्ष वेधतात. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर राजकीय क्षेत्र ग्रामसंस्कृतीत वाढलेल्या व्यक्तींच्या व समूहाच्या हातातच आहे; आणि पुढे दीर्घकाळपर्यंत ती सूत्रे तशीच या वर्गाकडे राहणार आहेत. तेव्हा या वर्गाने ग्रामसुधारणेबाबत इष्ट तो पुढाकार घ्यायलाच हवा. महाराष्ट्राच्या विकासासाठी तो आवश्यकच आहे. परंतु आजच्या राजकीय नेत्यांचा सारा भर दाखवेगिरीवर आणि सत्तापिपासूपणावर असल्यामुळे त्यांचे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विकासाकडे दुर्लक्ष



होत आहे. थोडेफार लक्ष पुरविले गेले तर ते कामचलाक आणि स्वार्थप्रेरित असते. या वस्तुस्थितीचे भान नवीन ग्रामीण लेखकांना आतूनच आले आणि त्यांची संवेदनशीलता या दिशेने जागृत व कार्यरत झाली तर यातून एक नवे विधायक बहुरंगी सांस्कृतिक जागरण होऊन ग्रामीण साहित्याला आशय, अभिव्यक्ती आणि नवी दिशा गवसेल. ग्रामीण जीवनाकडे उघड्या डोळ्यांनी आणि समग्रपणे पाहून, त्यातून येणाऱ्या अनुभूतींना साकार करताना अवलोकनाचे नवनवे मुलूख त्याला पादाक्रान्त करता येतील. त्याच्या कलेला नवे घुमारे फुटतील.

ग्रामीण दलित, जनवादी किंवा स्त्रीमुक्तिवादी साहित्याचा पायाच पुरेसा भक्कम वा लांबरुंद नाही; हा मुक्तिवाद मूठभर शहरी संवेदनविश्वाशी अवाजवी प्रमाणात संबद्ध झाला आहे; नागरसाहित्याच्या आंधळ्या अनुकरणात गुरफटत गेला आहे. आजच्या भारतीय स्थितीचा वेध घेता, ज्या ज्या घटितांच्या आधारावर हे प्रबोधनयुग उभे आहे त्याबाबत फारच असमाधान व्यवहारतः जाणवते असे कुलकर्णींचे मुख्य सूत्र आहे. आणि या साहित्य चळवळींना तसेच होतकरू लेखकवाचकांना वाङ्मयीन जाणिवेच्या दृष्टीने अभिज्ञ बनविण्यासाठी खूप वाटचाल होण्याची आवश्यकता आहे असेही त्यांना वाटते. साहित्यनिर्मिती ही व्यक्तिनिष्ठ वाटली तरी ती प्रत्ययदृष्ट्या सामाजिक बनली तरच तिला व्यापक अन्वयार्थ प्राप्त होतो; हे लक्षात घेऊन ग्रामीण साहित्य चळवळीचे धागेदोरे परोक्षपणे समकालीन वा पूर्वकालीन संस्कृती-वातावरणाशी कसे घट्ट भिडलेले आहेत याचे भान कधीही नजरेआड होऊ नये अशी गोमंची भूमिका आहे. मध्यवर्ती नागर साहित्याचेच कमी जास्त अनुसरण करीत राहिलेल्या ग्रामीण साहित्याने आपली वेगळी अस्मिता शोधायला हवी. आपला देशीपणा दाखवायला हवा, आधुनिक जीवन व्यवहार आणि देशीपणा यांची सांगड घालायला हवी, आणि केवळ प्रचलित ग्रामसंस्कृतीचाच नव्हे तर कालच्या व आजच्या भारतीय जीवनाचा सर्वांगीण शोधबोध घेण्याचेही उत्तरदायित्व पार पाडायला हवे असा गोमंचा आग्रह आहे.

'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या' या डॉ. आनंद यादव यांच्या पुस्तकाला १९७९ साली लिहिलेल्या प्रस्तावनेतील काही भाग देण्यात आला आहे. १९४० च्या सुमाराला नवसाहित्याचा व ग्रामीण साहित्याचा उदय झाला. श्री. म. माटे यांनी ग्रामीण जीवनाचे अस्सल चित्रण केले पण ग्रामीण साहित्य हे मागेच रेंगाळत राहिले. कारण त्यांना आरंभ बहुजन समाजाच्या स्फूर्तीतून न होता, पांढरपेशांनी पांढरपेशांसाठी निर्माण केलेली ठूम म्हणून ग्रामीण पार्श्वभूमीवरील साहित्याची अभिव्यक्ती होत राहिली. रविकिरण मंडळाच्या कवींनी जनपद गीतांमार्फत ग्रामीण निसर्गाची स्वप्निल चित्रे रेखाटली. श्री म. माटे यांची भूमिका साहित्यिक नसूनही त्यांचे ग्रामीण लेखन कलेच्या पदवीला पोचले; बाकीच्या लेखकांनी ग्रामीण साहित्याची प्रतिष्ठा

वाढविण्याऐवजी परवडच जास्त केली.

ग्रामीण साहित्याची डॉ. आनंद यादव यांनी केलेली व्याख्या कृषिप्रधान ग्रामजीवन केंद्रित असल्याने आणि कृषिवलाच्या जिवंत अनुभूतीतून भावलेल्या सत्यावर भर देणारी असल्याने काहीशी गैरसमज निर्माण करणारी आहे, असे गोमंचे मत आहे. यादवांचे समीक्षात्मक विचार पुष्कळदा सर्जनविषयक आत्मानुभूतीवर आधारलेले असतात असेही ते म्हणतात (पृष्ठ ११) यादवांचा ग्रामीण साहित्यातील भाषाविचारही त्यांना बंदिस्त वाटतो. (१२) ''वास्तवचित्रण म्हणजे केवळ प्रत्यक्षाताली घटितांचे दर्शन हे समीकरण ग्रामीण साहित्याच्या कक्षेचे आकुंचन करणारे ठरले. (१३) आजच्या ग्रामीण कथेतील वास्तव एकंदरीत फार ढोबळ किंवा सांकेतिक असते. ते आजच्यापेक्षा कालचे वास्तव असते. (१५) असे काही विचार या प्रस्तावनेत आले आहेत. 'ग्रामीण साहित्याच्या वाटचालीच्या दिशा आणि कोन' या लेखातही डॉ. आनंद यादव यांच्याच विवेचनाचा प्रारंभी परामर्श घेतला आहे. ''ज्यात आजचे वा कालचे ग्रामजीवन, त्याचे मनोव्यापार, सांस्कृतिक संवेदन सखोलपणे आणि सर्वांगीण स्वरूपात व्यक्त होते असे साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य'' (५२) अशी गोमंनी आपली व्याख्या दिली आहे.

साहित्याची गुणवत्ता विद्रोही असण्या-नसण्यावर अवलंबून नसते; ग्रामीण साहित्य चळवळीला स्वत:ची तत्त्वप्रचुर जीवनदृष्टी नाहीच तिने विचाराच्या क्षेत्रात लक्षणीय भर घातल्याचा पुरावा नाहीच या साहित्याला स्वत:ची अशी एक साक्षात्कारी दृष्टी (व्हिजन) नाही, लोकशाही मानवतावादाचा स्थूळ आराखडा ग्रामीण चळवळीच्या प्रवक्त्यांना अभिप्रेत असला तरी तो तेवढासा बाळसेदार झालेला नाही. संतसाहित्यात दिसणाऱ्या ग्रामीण संवेदनशीलतेचे स्फुरण विशिष्ट तत्त्वबळामुळे श्रीमंत वाटते तसे येथे होत नाही (१९) अशी मीमांसा गो.म. कुलकर्णी यांनी केली आहे.

वास्तववादाचे विविध अन्वयार्थ लक्षात घेतल्यास मराठी ग्रामीण साहित्याची स्थिती फारशी समाधानकारक नसल्याचे जाणवते. (२५) कादंबरीचा व्याप पेलणारे ग्रामीण लेखक फार कमी आहेत आणि यशस्वी ठरलेल्या कथालेखनातही अंतर्भेदी वास्तवदर्शन फारसे आढळत नाही. (२५) हा गो.म. कुलकर्णी यांचा निष्कर्ष अनेकांना आवडणार नाही. बरेचसे नकारात्मक असे प्रतिपादन या पुस्तकात आहे.

गो.मं. च्या या लेखांतून काही मुद्दे पुन:पुन्हा येतात. परंतु ग्रामीण लेखक किंवा कथा-कविता-कादंबऱ्या यांचे स्वतंत्र विवेचन येत नाही. काही चांगल्या कृतींचे आस्वादात्मक विवेचन करून ग्रामीण साहित्याच्या बलस्थानांचेही दर्शन घडवायला हवे होते. नव्या लेखनाचे उल्लेख या लेखांमध्ये येत नाहीत. त्यामुळे काही ठराविक आवर्तने घेण्यातच गो. म. रमलेले दिसतात.

***मराठी ग्रामीण साहित्य : परिसर आणि प्रवाह, पृष्ठे ६०, चाळीस रुपये***



**भयप्रद रोगांचा प्रभावीपणे मुकाबला करणाऱ्या लसींचे रोमहर्षक वैविध्य**

# नवचैतन्याचा झरा

**मूळ लेखक : डॉ. बाळ फोंडके**
**अनुवाद : डॉ. प्रमोद जोगळेकर**

'शॉट इन दि आर्म' या डॉ. बाळ फोंडके यांनी नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ सायन्स कम्युनिकेशन या संस्थेसाठी लिहिलेल्या पुस्तकाचा हा अनुवाद. डॉ. जी. त्यागराजन् यांना हे पुस्तक अर्पण करण्यात आले आहे.

रोग झाल्यावर उपचार करण्यापेक्षा रोग होऊच नये अशी तरतूद करणे इष्ट, हे आरोग्य संवर्धनाचे एक महत्त्वाचे सूत्र आहे; आणि योग्य काळजी घेतली तर अनेक रोग टाळता येतात, हेही आता आधुनिक वैद्यकशास्त्रीय संशोधनामुळे आपल्या लक्षात येऊ लागले आहे. देवीच्या रोगाचे उच्चाटन हा आधुनिक विज्ञानाचा एक अभिमानास्पद मानबिंदू आहे; आणि रोगजंतूंविरुद्ध आधीच प्रतिबंधात्मक कारवाई करून त्यांचा दुष्परिणाम टाळणे अधिक श्रेयस्कर ही विचारसरणी आता सर्वसंमत होत चालली आहे. प्रभावी प्रतिजैवकाच्या उपब्धतेमुळे अनेक रोगजंतूंच्या अनिष्ट व भयावह अनिष्ट चक्रातून मानवाची मुक्तता होणे शक्य झाले आहे. अर्थात आपल्याला उपलब्ध झालेल्या तथाकथित जीवरक्षक औषधांना न जुमानणारे रोगजंतूही विकसित होत आहेत आणि त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी जगभरचे शास्त्रज्ञ प्रयोग करीत आहेत. या रोगजंतूंना मानवी शरीरात प्रवेश करणेच अशक्यप्राय ठरावे अशा उपयुक्त प्रभावी लसींची निर्मिती करण्यासाठी जगभरचे शास्त्रज्ञ प्रयोग करीत आहेत आणि माणसाला निरोगी जीवनाचे वरदान देण्यात अशा नवनवीन लसींचे शोध महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहेत. जैवतंत्रज्ञान अशा नव्या संशोधनासाठी बद्धपरिकर असून आपल्या प्रयोगांद्वारे निरामय निरोगी मानवी जीवनाची नवी मांडणी करण्यावर त्याचा भर आहे.

डॉ. बाळ फोंडके यांनी प्रतिबंधात्मक लसीकरणाद्वारे अनेक रोगांवर प्रभावी

उपाययोजना करण्याचे जगभरच्या शास्त्रज्ञांनी चालवलेले जे प्रयत्न आहेत, त्यावर आपल्या शॉट इन दि आर्म या पुस्तकाद्वारे प्रकाश टाकला आहे. त्याचेच मराठीकरण नवचैतन्याचा झरा या नावाने प्रसिद्ध होत आहे.

डॉ. सी. आर. भाटिया यांनी प्रस्तावनेत आधुनिक लस-शास्त्राचे महत्त्व व महात्म्य स्पष्ट केले आहे.

लसीकरण विज्ञानातील प्रगतीमुळे अनेकविध रोग होण्याआधीच त्यांचा प्रभावी बंदोबस्त करणे मानव प्राण्याला शक्य झाले आहे. विशिष्ट रोग आणि त्याचे सूक्ष्म जंतू यांच्यातील नाते लुई पाश्चरने प्रथम दाखवून त्या रोगांचा बंदोबस्त काट्याने काटा काढावा या सूत्राद्वारे करण्याची शक्यता माणसाच्या आटोक्यात आणली. एडवर्ड जेन्नरने कांजिण्यांपासून माणसाची मुक्तता केली. सध्या तीन प्रकारच्या लसी वापरण्यात येतात.

१) मृत रोगजंतूंचा वापर

२) जिवंत पण निष्प्रभ केलेल्या रोगजंतूंचा वापर

३) विषम रोगजंतूंचा वापर

या तीन प्रकारच्या लसींच्या जोडीला प्रतिरक्षण यंत्रणेची व जैवअभियांत्रिकीची प्रगती होत आहे, तिच्यावर आधारित नवीन लसींचीही निर्मिती होऊ लागली आहे. जन्मानंतर लगेच किंवा नंतर एकदाच डोस दिला तरी जन्मभर त्या विशिष्ट व्याधींपासून संरक्षण मिळावे अशी क्षमता विकसित करण्यावर संशोधकांचा भर आहे. अजूनही कुष्ठरोग आणि हिवताप (मलेरिया) यावर प्रभावी लस सापडलेली नाही. एड्सवरही प्रतिबंधक उपाय आटोक्यात आलेला नाही. कर्करोग हा संसर्गजन्य नाही, परंतु त्यावरही प्रतिबंधक लस देण्याची कल्पना प्रयोगावस्थेत आहे. पुरुष व महिला या दोघांना उपयोगी पडतील अशा जननविरोधी-संतति प्रतिबंधक लसींची निर्मिती करण्याच्या दृष्टीनेही प्रयोग चालू आहेत.

डॉ. बाळ फोंडके यांनी लंडनमधून जैवभौतिकी लसीकरण विज्ञान या विषयात डॉक्टरेट मिळवलेली आहे. २३ वर्षे भाभा अणुसंशोधन केंद्रात संशोधक म्हणून काम केले आहे; आणि शंभरावर शोधनिबंधही त्यांच्या नावावर प्रसिद्ध झालेले आहेत. 'सायन्स टुडे' या नियतकालिकाद्वारे लोकाभिमुख विज्ञानप्रसाराचे व्रत त्यांनी निरलसपणे चालवले. सर्वसामान्यांसाठी विज्ञानविषयक लोकाभिमुख लेखन करण्याबद्दल त्यांना इंदिरा गांधी पुरस्कार, डॉ. बी.जी. देव स्मृती पुरस्कार वगैरे अनेक सन्मान लाभलेले आहेत. अनेक विज्ञानकथा संग्रहही त्यांच्या नावावर आहेत.

'नवचैतन्याचा झरा' या पुस्तकात प्रगत जैवतंत्रज्ञान आणि लसीकरण विज्ञान याद्वारे मानवजातीला ग्रासणाऱ्या अनेक जीवघेण्या रोगांपासून मुक्तता मिळवून देण्याचे जे प्रयत्न झाले त्यांची अभ्यासपूर्वक माहिती देण्यात आली आहे.



प्रौढ माणसाच्या शरीरात एक हजार अब्ज (१ अब्ज म्हणजे १०० कोटी) लसिका पेशी असतात. त्यांचे एकत्रित वजन शरीराच्या वजनाच्या तुलनेत २ टक्के असते. पांढऱ्या रक्तपेशींमध्ये लसिका पेशींचे प्रमाण सुमारे वीस टक्के असते. लसिका पेशींपैकी १५ टक्के बी पेशी, ६५ ते ७० टक्के टी पेशी व उर्वरित वेगळ्या पेशी असतात. एखादा परका पदार्थ वा घटक शरीरात प्रवेश करतो तेव्हा या पेशी त्यावर प्रक्रिया करून त्याचे ओळखपत्र असणाऱ्या प्रतिजनाला टी पेशीपुढे उभे करतात. टी पेशींकडे परका घुसखोरांचे ओळखपत्र तपासण्याचे काम असते. शरीराच्या ज्या भागांतून घुसखोरी होऊ शकेल तेथे टी पेशींचा पहारा असतो. घुसखोर अनिष्ट पेशींबद्दल त्या मुख्य केंद्राला धोक्याचा इशारा देतात. बी पेशींना प्रतिद्रव्य बनवण्यासाठी सक्रिया मदत करतात. शरीराचे रक्षण करण्यासाठी टी पेशी स्वत:चे बलिदान करण्यासही सिद्ध असतात. त्या अष्टपैलू असतात. त्यांच्या तुकड्या सैन्याप्रमाणे वेगवेगळ्या भूमिका बजावतात. या पहारा देणाऱ्या टी पेशींच्या जोडीला मदतनीस अष्टपैलू टी-बी पेशी, मारेकरी वर्गातील टी सी पेशी, निर्बंधक सप्रेसर टी एस पेशी वगैरे असतात. इम्युनोग्लोब्युलिन जी या प्रतिद्रव्यामुळे घुसखोर जंतूंचा नायनाट करण्यात येतो.

शरीरात घुसखोरी करणाऱ्या पदार्थांची ओळख प्रथम टी पेशी तपासून घेतात आणि त्यावर प्राथमिक स्वरूपाचा सौम्य हल्ला करण्याचे काम लसिका पेशी करतात. या हल्ल्यात कार्यकारी पेशी (इफेक्टर सेल्स) बहुतेक नष्ट होऊन जातात. काही पेशी जिवंत राहतात. त्यांचे दीर्घकाळ टिकणाऱ्या स्मृतिपेशीमध्ये रुपांतर होते. अशा स्मृतिपेशींमुळे लस टोचणे यशस्वी होते.

शरीराची प्रतिरक्षण व्यवस्था एखाद्या रोगजंतूंविरुद्ध तसेच रसायनाविरुद्धही प्रतिकार करण्यास सक्षम असते; त्यामुळे अशा रोगाविरुद्ध लढणारी लस तयार करण्यात येते. रोगजंतूंनी निर्माण केलेल्या विषाला थोडेफार बदलून त्याची विषारीपणाची तीव्रता कमी करता येते. अशा सौम्य केलेल्या विषाला विषभ (टॉक्साइड) म्हणतात. लसीसाठी विषभाचा (टॉक्सा इडचा) वापर केला जातो. विषभ शरीरात टोचले की प्रतिरक्षण यंत्रणा रोगजंतूंनी निर्माण केलेल्या विषाचा नाश करण्याची क्षमता शरीरात येते.
संहारक रोगजंतूंची शक्ती क्षीण करुन त्यांना अहिंसक बनवले तर असे रोगजंतू एखाद्या प्रतिकृतीप्रमाणे काम करतात. निष्प्रभ केलेल्या रोगजंतूऐवजी मृत रोगजंतूंचा वापर देखील लसीसारखा करता येतो. योनास साल्क यांनी बनवलेली पोलिओची लस हे अशा प्रकारे रोगजंतू वापरून केलेल्या लसीचे उदाहरण होय.

काही रोगजंतू शरीरात एका ठिकाणी राहून दुसऱ्या भागात हल्ला करतात. हे रोगजंतू संपूर्ण रक्तात विषारी पदार्थ मिसळून सर्वच पेशींवर हल्ला करतात. धनुर्वाताचे रोगजंतू (क्लॉस्टिडीयम टेटॅनी) या प्रकारचे वर्तन करतात. ते त्वचेवरील जखमांतून

शरीरात प्रवेश करतात; पण शरीरात खोलवर असणाऱ्या स्नायूंवर परिणाम करून त्यांना जखडून टाकतात. घशातील टॉन्सिल्सनी निर्माण केलेले विष हृदयाच्या स्नायूंररही हल्ला चढवते. रोगजंतूंनी निर्माण केलेल्या विषाला थोडे सौम्य करून त्याचे विषभ (टॉक्साइड) लसीसाठी वापरण्यात येते. ते रोगजंतूंनी निर्माण केलेल्या विषाचा नाश करते.

सध्या देवी, पीतज्वर, टायफस, रेबीज, पोलिओ, इन्फ्लुएंझा, धनुर्वात, डांग्या खोकला, घटसर्प, क्षयरोग, कॉलरा, विषमज्वर, प्लेग, गोवर, जर्मन गोवर, गालगुंड, हिपॅटायटिस-बी यावर लसी उपलब्ध आहेत. या लसी मृत, जिवंत, विषभ, पुनर्रचित डीएनए वगैरे प्रकारांनी वापरल्या जातात.

भविष्यकाळातील लसी स्वस्त, सुरक्षित, शक्तिशाली, स्थिर, अचूक आणि आयुष्यभरासाठी प्रतिरक्षण पुरवणारी असाव्यात अशा प्रकारे संशोधन चालू आहे. लसींच्या रूपाने मानवाच्या हाती सूक्ष्मरोगजंतूंचा प्रभावी बंदोबस्त करण्याचे हत्यार उपलब्ध झाले आहे. अनेक रोगांवर प्रभावी लस शोधण्याचे प्रयत्न चालू आहेत. कोलेस्टेरॉल या रेणूविरुद्ध प्रतिकार यंत्रणा प्रतिद्रव्ये तयार करते, हे लक्षात आल्यावर डॉ. अल्विंग प्रभृतींनी त्यावर संशोधन करून कोलेस्टेरॉलविरोधी प्रतिद्रव्यांची निर्मिती करणारी लस बनवण्याचे प्रयोग चालू केले आहेत. लोकसंख्या कमी करण्यासाठी जननविरोधी लस बनवून गर्भनिरोधन प्रभावीपणे होऊ शकेल या दिशेनेही प्रयत्न चालू आहेत.

नवनव्या शोधांची सुबोधपणे माहिती देणारी अशी पुस्तके विज्ञानक्षेत्रातील अद्ययावत संशोधनाची विस्मयकारक झेप दाखवणारी आहेत.

***नवचैतन्याचा झरा, पृष्ठे १०८, पासष्ट रुपये***

**पुरस्कारांचे मानकरी सांगा**

**फेब्रुवारी ९९ निकाल**

| | | |
|---|---|---|
| १) | ज्ञानपीठ पुरस्कार | गिरीश कर्नाड |
| २) | साहित्य अकादमी | डॉ. सदानंद मोरे |
| ३) | बंधुता पुरस्कार | प्रा. राम शेवाळकर |
| ४) | बहिणाबाई पुरस्कार | पुरुषोत्तम पाटील |
| ५) | दमाणी पुरस्कार | राजन गवस |
| ६) | शांताराम कथा पुरस्कार | मेघना पेठे |

**एकमेव विजेता स्पर्धक :**

**मधुसूदन वा. सराफ,** सी-१/५६/६, श्रीरंग सोसायटी, ठाणे (प)-४०० ६०१.

***अभिनंदन!*** आपण आपल्या पसंतीची रु. १००ची पुस्तके कळवावीत.

आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथजगत,** १२१६, सदाशिव पेठ, पुणे-३०.



# फुले आणि काटे

## भाषांतर हा स्वतंत्र वाङ्मय प्रकार मानणे इष्ट

भाषांतराकडे एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून आपले लक्ष गेलेले दिसत नाही. केंद्रिय साहित्य अकादमीने भाषांतरासाठी पुरस्कार जाहीर केल्यापासून ही परिस्थिती थोडी बदलली आहे. परंतु भाषांतरे प्रबोधने घडवितात या प्रमुख उद्देशाने जोरदान चळवळ उभी राहिलेली नाही. ''भाषांतरे ही अद्वितीय साहित्यसंस्कृतींचे प्रतिध्वनी असतात'', स्वतंत्र साहित्यकृती म्हणून त्यांचे मूल्यमापन करणे शक्य होत नाही, ही पारंपरिक दृष्टी आता - साहित्यात बदलत आहे. भाषांतर हे एक प्रकारे साहित्यकृतीचे अर्थपूर्ण अर्थनिरूपणच असते. कदाचित तेच अधिक थेट आणि स्पष्ट अर्थनिरूपण ठरावे. फ्रेंच भाषांतर वाचेपर्यंत स्वत:लाच फाऊस्ट या साहित्यकृतीचे काही अभिप्रेत अर्थ आपल्याला उमगलेले नव्हते, असे स्वत: गटेने म्हटले आहे. फाऊस्टमधील दुर्बोध भागांचे स्पष्टीकरण देण्यासाठी मूळ जर्मन भाषेतच अनेक स्वतंत्र प्रबंध लिहिले गेले आहेत. भाषांतराच्या शैलीशास्त्रीय तुलना संशोधन प्रभावांच्या इतिहासाला पूरक ठरतात. रशियन रूपवाद्यांनी पुरस्कृत केलेला भाषांतराचा सिद्धान्त लक्षात घ्यायला हवा. फ्योदोर दोस्तोवस्की किंवा काउट लिओ टालस्टॉय या रशियन कादंबरीकारांच्या कादंबऱ्यांचे मराठी भाषांतर झाले तर तो मराठी साहित्याचा भाग समजावा, रशियन नव्हे असे हा सिद्धान्त सुचवितो.. अशा पद्धतीचा अभ्यास अजून मराठीत, इंग्रजीत झालेला नाही.

*डॉ. आनंद पाटील (तौलनिक साहित्य- नवे सिद्धान्त आणि उपयोजन पृष्ठ ६६-६७, साकेत प्रकाशन, औरंगाबाद)*

## समीक्षेच्या कालखंडाची बदलती केंद्रे-

टेरी इगल्टनने आधुनिक वाङ्मयीन सिद्धान्ताच्या अवस्था सांगितलेल्या आहेत, त्यांच्याशी मराठी साहित्याच्या विकासातील टप्पे जुळवून पाहता येतील.

एकोणिसाव्या शतकातील रोमँटिसिझम समीक्षेचे केंद्र लेखक हे होते.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील नवसमीक्षेचे केंद्र साहित्यकृती व संहिता हे होते.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील उत्तराधुनिक समीक्षेचे केंद्र वाचक हे होते.

(तौलनिक साहित्य पृष्ठ २८९)

दलित काव्य हे दलित संसारचित्रही आहे.

दलित काव्य हा नाटकातील 'स्वगता' सारखा, त्यातील संवादासारखा एक

परफार्मन्स आहे. स्वत:ला किंवा स्वेतरांना उद्देशून काहीतरी बोलण्याची त्याला निकड आहे. स्वत:चे विचार किंवा कल्पना स्वत:साठी बोलून दाखवितानाही ते विचार नि कल्पना कुणीतरी समोरच्याने ऐकाव्यात अशी आकांक्षा त्यात गर्भित आहे. एवढेच नव्हे तर असे बोलत असताना त्या बोलण्याला अनुरूप असे स्वरांचे, हालचालींचे अभिनयात्मक जोड अंग राखण्याची नकळत ऊर्मीही त्यातून सूचित होते. हे काव्य समूहापुढे सादर केले जात आहे अशीच ठेवण त्याला लाभलेली आहे. आपण समोरच्यांच्या डोळ्यांना दिसावे, आपण त्यांना केवळ काही ऐकविण्यापेक्षा काही दृश्य स्वरूपात दाखवावे, पुष्कळांनी आपणास ऐकता ऐकताच पाहावे अशी दलित काव्याची प्रकृती आहे. स्वगत, संवाद, संभाषण आदी अंगांनी एक नाट्यात्म सादरीकरण साधण्याची दलित काव्याची नैसर्गिक प्रेरणा आहे. ते नाट्य प्रेक्षकांप्रमाणेच समोर विराट समूह हे मन:चक्षूंनी पाहतच अवतरते. हे काव्य त्या कल्पित समूहासाठी ज्याप्रमाणे स्वगत, संवाद व संभाषणे सादर करीत असते, त्याप्रमाणे प्राचीन ग्रीक नाटकातील समूहगीतासारखे, कोरससारखे वृंदगानही गात असते. हे वृंदगान दलित वृंदांचे असते, त्यांच्या भाषेतील आणि भावनेतील असते. म्हणनच दलित काव्य, विशेषत: नामदेव ढसाळांचे काव्य, लोक भाषेतील शब्दकळा धारण करते. एक दलित कलोक्विअल भाषासरणी वापरते. दलित काव्य हे दलित संसारचित्रही आहे. नाटक हेही संसारचित्रच असते. दलितांच्या काव्यात मराठी कवितेत विझत गेलेली वस्तुनिष्ठता नव्या तेजाने झळझळत आहे. काव्याच्या अंगाने व अंगापुरती उमटलेली ही संसारचित्रे मोठी नाट्यपूर्ण आहेत. त्यातून दलित नातीगोती कोणत्या ना कोणत्या जीवनकलहात गुंतून पडल्याची वर्णने येतात. नाटकाच्या घाटाची बीजे त्या संसारचित्रात लपलेली असतात.

*प्रा. रा. ग. जाधव (आगळीवेगळी रंगभूमी, पृष्ठ १११-१२)*

## नि:संदर्भ होत जाणाऱ्या मनुष्यजीवनाचे कृष्ण आकलन

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील कनिष्ठ मध्यमवर्ग या नाट्यरूपांच्या केंद्रस्थानी आहे. या वर्गातील व्यक्तिजीवन, कलाजीवन, कुटुंबजीवन, स्त्री-पुरुष संबंध नव्या जाणिवांच्या वातचक्रात भिरभिरत आहे. हे सर्वच घटक नव्यानेच झालेला स्वत:च्या ओळखीमुळे विविध पातळ्यांवरील अंत:कलहाला व अंतर्वेदनांना अटळपणे सामोरे जात आहेत. मनुष्यजीवनातील सुखात्मता आणि दु:खात्मता या सांकेतिक द्विदलीय परिप्रेक्ष्याबाहेर पडल्याशिवाय आपल्या अस्तित्वाला अर्थपूर्णताच येता नाही, ही सत्यता स्वीकारण्याची पाळी त्याच्यावर आली आहे. कमालीच्या उत्कटतेने, अनावरपणे व प्रक्षुब्धतेने ते घटक त्या द्विदलीय परिप्रेक्ष्याबाहेरील रिक्त अवकाशात फेकले जात आहेत किंवा स्वत:ला झोकून देत आहेत. सुखात्मिका व शोकात्मिका या दोन ध्रुवांमधली कृष्णविवरे अशी आहेत की त्यात सुखात्म अनुभवांना ओशाळलेपण, अपराधीपण आणि वंचनामूलकता टाळता येता नाही आणि दु:खात्म अनुभवांना हास्यास्पदता, कारुण्यबधिरता, निरर्थकता अव्हेरता येत



नाही. हे सर्वच घटक सुखावूही शकत नाहीत, दु:ख प्रचीतीही घेऊ शकत नाहीत. सुखदु:खाच्या जाणिवा त्या रित्या अवकाशात अंधारून झालेल्या आहेत. त्या काळोखग्रस्त झालेल्या आहेत. बाजीरावाच्या एका शून्याजवळच स्वातंत्र्योत्तर काळातील अनेक अनामिक व्यक्तींची, कुटुंबाची, कलावंतांची, स्त्री-पुरुष संबंधांची अनेक शून्ये गोळा होत जातात. ही शून्ये समग्र युगधर्म नसली तर युगधर्माची काही थरथरती व थरारक स्पंदने मात्र निश्चितच आहेत. नि:संदर्भ होत जाणाऱ्या मनुष्य जीवनाचे हे कृष्ण आकलन मला घेरत जाते, विळखा घालून बसते. म्हणूनच आगळ्यावेगळ्या नाट्यरूपांचा मागोवा हा एका मर्यादित अर्थाने स्वयंपूर्ण असा नाट्यात्म विचारव्यूह ड्रॅमॅटिक डिस्कोर्स ठरतो.

*प्रा. रा.ग. जाधव (आगळीवेगळी नाटके पृष्ठ ३-४, नवीन उद्योग प्रकाशन, १३४/२ शुक्रवार पेठ, पुणे.)*

## 'सुखी, शांत, समृद्ध जीवनाची कला'चे प्रकाशन

'सुखी, शांत समृद्ध जीवनाची कला' या पुस्तकात भगवद्गीतेतील कर्मयोगाच्या संदेशाचे महात्म्य वेगवेगळ्या भूमिकांतून दाखवण्यात आले आहे; असे मत पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. देवदत्त दाभोळकर यांनी या पुस्तकाचे प्रकाशन करताना सातारा येथे प्रकट केले. जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी म्हणून निवृत्त झालेला ह. ल. रानडे यांनी अध्यात्मविषयक लेखन चिंतनात उर्वरित आयुष्य व्यतीत करून सहस्त्रचंद्र दर्शनानंतर या पुस्तकाची सिद्धता केली याचे कौतुक वाटते असे प्राचार्य पुरुषोत्तम शेठ यांनी म्हटले. ग्रंथविशेष प्रतिष्ठान, ८५७ शनिवार पेठ, सातार यांनी त्याचे प्रकाशन केले आहे.

## शरदबाबू पुरस्कार : दीपा गोवारीकर यांच्या 'वसा' या कथासंग्रहात

प्रसिद्ध लेखिका ज्योत्स्ना देवधर यांनी दिलेल्या निधीतून देण्यात येणाऱ्या शरदबाबू पुरस्कारासाठी यावर्षी दीपा गोवारीकर यांच्या वसा या कथासंग्रहाची निवड करण्यात आली. डॉ. सरोजिनी वैद्य यांच्या हस्ते दि. १९ मार्च रोजी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पाच हजार रुपयांचा हा पुरस्कार महिला साहित्यिकांसाठी आहे.

## प्रेरणा साहित्य कला प्रतिष्ठानतर्फे पुरस्कार

पुण्याच्या प्रेरणा साहित्य कला प्रतिष्ठानतर्फे डॉ. माधव मुतालिक (माझे तसे ठीक चालले आहे), सिसिलिया कार्व्हालो (अंतर्यामी), यांना काल पुरस्कार देण्यात आले. दोन दिवसांच्या कविता महोत्सवात आधुनिक मराठी कवितेचे भोगदान या विषयावर चर्चासत्र झाले. कविसंमेलनात रामदास फुटाणे, अरुण म्हात्रे, इंद्रजित भालेराव, प्रकाश पठारे प्रभृतींनी भाग घेतला.

## यशवंतराव चव्हाण पुरस्कार

पुण्याच्या गंगा लॉज मित्रमंडळाच्या वतीने दरवर्षी यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त १२ मार्च रोजी एक मान्यवर साहित्यकार व नवीन कवी यांना पुरस्कार देण्यात येतात. यंदा अमरावती विद्यापीठाच्या ललित कला अकादमीचे अधिष्ठाता डॉ. मधुकर राकोडे यांना पाच हजाराचा पुरस्कार देण्यात आला. संगीत बर्वे (मृगजळ), विजय चोरमारे, अनिल पाटील, जगदीश कदम या कवींनाही प्रत्येक हजार रुपयाचे पुरस्कार मा. शरद पवार यांच्या हस्ते देण्यात आले. या वेळी झालेल्या कविसंमेलनाचे सूत्रसंचालन फ. मु. शिंदे आणि रामदास फुटाणे यांनी केले.

## शांकरभाष्याचा भावानुवाद

श्रीमद् भगवद् गीतेवरील शांकरभाष्य भावानुवाद या उदय कुमठेकर यांच्या पुरस्तकाचे प्रकाशन कलामंदिर नांदेड येथे दि. २२ फेब्रुवारी १९९९ रोजी पंचगंगातीर वासी करवीर पीठाचे शंकराचार्य स्वामी श्री विद्याशंकर भारती यांच्या पवित्र करकमलाद्वारे म. म. ब्रह्मश्री यज्ञेश्वरशास्त्री कस्तुरे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या वेळी प्रमुख वक्ते म्हणून प्राचार्य राम शेवाळकर, कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे, प्रा. सुरेश द्वादशीवार, डॉ. यु म. पठाण प्रभृती उपस्थित होते. रजत प्रकाशन, ४६२ आविष्कार कॉलनी, सिडको-एन ६, औरंगाबाद तर्फे सौ. अनिता कुमठेकर यांनी हा पाचशे पृष्ठांचा ग्रंथ प्रकाशित केला असून त्याला श्री विद्याशंकर भारती यांची विस्तृत प्रस्तावना आहे.

## नवीन पुस्तकांचे परिचय देणारे मासिक

'परिचय प्रकाशन वार्ता' हे अ. भा. मराठी प्रकाशक संघ पुरस्कृत मासिक आक्टोबर १९९८ पासून नाशिकहून प्रसिद्ध होत आहे. त्याचे संपादक दिनेश प्र. कुलकर्णी हे असून वार्षिक वर्गणी ६० रुपये आहे.

पत्ता– मानसद्वीप प्रकाशन, ११ शिवपूजा, चौघुले विहार, गंगापूर रोड, नाशिक ४२२००२. फोन (०२५३) ३१२८२०. नवीन पुस्तकांचे परिचय प्रकाशकांच्या आर्थिक सहभागाद्वारे देण्यावर या मासिकाचा भर आहे.


*आजच्या जीवघेण्या स्पर्धात्मक जगात*

***व्यवसाय कोणता आणि कसा निवडावा***

***याविषयी समग्र माहिती देणारे एकमेव पुस्तक***

**व्यवसाय मार्गदर्शक**

*मूळ इंग्रजी लेखिका :* ***जयंती घोष***

*अनुवाद :* ***मीना किणीकर***

पृष्ठे : **३२६** किंमत : **१००** रुपये पोस्टाने : **११५** रुपये

**मेहता पब्लिशिंग हाऊस,** १२१६, सदाशिव पेठ, पुणे. ✆ ४७६९२४